ड्रायफ्रुटस् आणि चटकदार खड्या मसाल्याचे
ठोक व किरकोळ विक्रेते
भूमी एजन्सीज
उत्कृष्ट दर्जा माफक दर
Follow us
@bhoomiagencies
आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर मो. 9011163452

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गोड गोड हुरडा
गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह
निसर्गाचा
मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक
मनोरंजनाची साधने व
इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह
साईबनमध्ये
हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध
आजच संपर्क करा
डॉ. कांकरियांचे साईबन
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
साईबन कृषी पर्यटन केंद्र,
एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०७.०१.२०२५ | अंक नं. २६० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# जिल्हा पोलिस अधिक्षकांनी कारवाईचे आश्वासन देवूनही व्यापाऱ्यांच्या जमिनींवर ताबेमारी सुरूच

## शेतजमिन, पोल्ट्रीशेडवर ताबा मारत नगरच्या व्यापाऱ्याला धमकावले, नगर तालुक्यातील आणखी एक प्रकार समोर, पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - अहिल्यानगर शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनींवर ताबेमारी करणाऱ्या विशिष्ट समाजाच्या लोकांवर कारवाई करावी या मागणीसाठी आ.संग्राम जगताप यांच्या सह व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलिस अधिक्षक राकेश ओला यांची भेट घेत निवेदन देवूनही हे प्रकार सुरूच आहेत. नगर शहरातील व्यापाऱ्याच्या बाबुर्डी घुमट (ता.नगर) गावच्या शिवारात असलेल्या शेत जमिनीत अनोळखी ४ ते ५ जणांनी अतिक्रमण करत पोल्ट्रीशेडवर ताबा मारल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या शेतमालकालाच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत दमबाजी करण्यात आली. या प्रकरणी त्या अनोळखी ४ ते ५ जणांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुदर्शन दिलीप डुंगरवाल (वय ४२, रा.सिताबन लॉन्स जवळ, कोठी रोड, मार्केटयार्ड) यांनी सोमवारी (दि.६) दुपारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा नगर शहरात व्यापार असून त्यांची नगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट गावच्या शिवारात गट नंबर २१० मध्ये ३ हेक्टर ४३ आर. एवढी शेत जमीन आहे. फिर्यादी डुंगरवाल हे सोमवारी (दि.६) दुपारी १ च्या सुमारास शेत जमिनीत फेरफटका मारण्यासाठी गेले असता त्यांना त्यांच्या शेतात बंद स्थितीत असलेल्या पोल्ट्रीशेड मध्ये ४ ते ५ इसम अनाधिकाराने वास्तव्य करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

डुंगरवाल यांनी तेथे जावून त्यांना तुम्ही माझ्या शेतात असलेल्या माझ्या मालकीच्या पोल्ट्री शेड मध्ये काय करता? अशी विचारणा केली असता, त्या अनोळखी इसमांनी डुंगरवाल यांना दमबाजी सुरु केली. आम्ही येथेच राहणार आहोत, ही जागा आमची आहे. आमच्या नादी लागू नका, तुम्ही इथून लगेच निघून जा नाहीतर तुमच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अनोळखी ४ ते ५ इसमांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२९ (२), (३), ३५१ (२) गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो.हे.कॉ. गांगुर्डे हे करीत आहेत.

### महिनाभरात ताबेमारीचा दुसरा गुन्हा

नगर शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी शहरालगत असलेल्या नगर तालुक्यात शेत जमिनी घेतलेल्या आहेत. अशा व्यापाऱ्यांच्या शेतजमिनीवर एका विशिष्ट समाजाच्या लोकांकडून ताबेमारी सुरु आहे. मागील महिन्यात नगर मधील किराणा दुकानदार संतोष फुलचंद गांधी (वय ५६, रा.शांती विहार कॉलनी, सारसनगर) यांच्या मालकीच्या वाटेफळ शिवारात असलेल्या शेतजमिनीत अनोळखी ८ ते १० महिलांनी अतिक्रमण करत कापडी झोपड्या उभारल्याचा प्रकार समोर आला होता. याबाबत विचारणा करण्यास गेलेल्या शेतमालकालाच दमबाजी करण्यात आली. या प्रकरणी त्या अनोळखी महिलांवर ५ डिसेंबर २०२४ रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानंतर महिनाभराने आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या ताबेमारीच्या प्रश्नासंदर्भात काही दिवसांपूर्वी आ.संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला यांना भेटले होते. त्यावेळी पोलिस अधिक्षकांनी कारवाईचे आश्वासन दिले होते. मात्र तरीही ताबेमारीचे प्रकार सुरूच असल्याने पोलिस प्रशासनाकडून खरेच कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

# रस्त्यात अडवून रिक्षा चालकासह प्रवाशांना मारहाण करत 'लुटले'

## नगर-पुणे महामार्गावरील घटना, ४ लुटारुंवर गुन्हा दाखल


प्रकाश मिरजे (जखमी)

नगर - नगरहून प्रवाशी घेवून सुप्या कडे चाललेल्या रिक्षाला ४ अनोळखी व्यक्तींनी अडवून रिक्षाचालकासह प्रवाशांना लाकडी दांडके, लोखंडी वस्तूने मारहाण करत त्यांच्या कडील रोख रक्कम व दागिने लुटल्याची घटना नगर-पुणे महामार्गावर चास (ता.नगर) गावाच्या पुढे असलेल्या घाटात रविवारी (दि.५) रात्री घडली.

या प्रकरणी रिक्षाचालक प्रकाश भानुदास मिरजे (वय ५०, रा. पाटील गल्ली, भिंगार) यांनी सोमवारी (दि.६) रात्री उशिरा नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी मिरजे हे रविवारी सायंकाळी त्यांच्या रिक्षात नगरमधून काही प्रवासी घेवून सुप्याकडे जात होते. रात्री ७.३० च्या सुमारास ते चास घाटात पोहचले, तेंव्हा त्यांच्या रिक्षाला कुणीतरी दगड फेकून मारला. त्यामुळे त्यांनी रस्त्याच्या कडेला रिक्षा थांबविली.

त्याच वेळी ४ अनोळखी इसम तेथे आले व त्यांनी रिक्षाचालक मिरजे यांच्या सह रिक्षामधील प्रवाशांना लाकडी दांडके, लोखंडी वस्तूने मारहाण सुरु केली. त्यांना दमदाटी करत त्यांच्या जवळील रोख रक्कम सोन्याचे दागिने असा ११ हजारांचा ऐवज बळजबरीने हिसकावून घेत तेथून पसार झाले. या लुटारुंच्या मारहाणीत जखमी झालेल्या रिक्षाचालक प्रकाश मिरजे यांनी दवाखान्यात उपचार घेवून सोमवारी रात्री नगर तालुका पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

पोलिसांनी अनोळखी ४ लुटारुंच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (६) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते हे करीत आहेत.

# रेशन कार्ड संबंधित कामासाठी शहरातील नागरिकांना मारावे लागताहेत 'हेलपाटे'

## प्रक्रिया सुरळीत करण्याच्या मागणीसाठी युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांचा अन्नधान्य वितरण कार्यालयात ठिय्या

नगर - रेशन कार्ड आणि त्यासंबंधित कामासाठी शहरातील नागरिकांना महिनो महिने हेलपाटे मारावे लागत आहेत. सर्व्हर डाऊन असल्याने ऑनलाईन प्रक्रिया ठप्प असल्याचे कारण देत शहर अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून नागरिकांना वेठीस धरले जात आहे. याविरोधात शिवसेनेच्या युवा सेनेने मंगळवारी (दि. ७) अन्नधान्य वितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत रेशनिंग प्रक्रिया सुरळीत सुरू करण्याची मागणी केली. येत्या आठ दिवसात सर्व प्रक्रिया सुरळीत करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.


रेशन कार्ड संबंधित प्रक्रिया सुरळीत सुरू करावी, या मागणीसाठी अन्नधान्य वितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करताना युवासेनेचे युवा अधिकारी आनंद राठोड, कामगार सेनेचे शहरप्रमुख गौरव ढोणे, सुनिल भोसले आदी. (छाया - लहू दळवी)

नवीन रेशन कार्ड काढण, नवीन नावे समाविष्ट करणे अथवा नावे वगळणे, कार्डची ऑनलाईन नोंदणी करणे, कार्ड बदलून घेणे, नाव व पत्त्यात दुरुस्ती करणे असे विविध स्वरूपाची कामे अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून केली जातात. मात्र मागील काही महिन्यांपासून या कार्यालयात कामच होत नसून, आठ दिवसांनी या, पंधरा दिवसांनी या असे म्हणत अधिकारी-कर्मचारी नागरिकांना टोलवाटोलवी करतात. ऑनलाईन प्रक्रिया वरूनच बंद असल्याचे कारण दिले जाते. त्यामुळे अनेक नागरिक महिनो महिने या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. काही महिला, नागरिक तर वर्षभरापासून कामानिमित्त या कार्यालयात हेलपाटे मारत आहेत. जिल्ह्यातील इतर ठिकाणी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने रेशन कार्ड संदर्भातील नागरिकांची कामे केली जातात. मात्र शहर अन्नधान्य कार्यालयाकडून ऑफलाईन कामे तर बंद असून, ऑनलाईन कामेही विविध कारणे देऊन टाळली जात आहेत. रेशन कार्ड संबंधी काही किरकोळ कामेही होत नसल्याने या कार्यालयाकडून नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप करत शिवसेना युवासेनेचे युवा अधिकारी आनंद राठोड, कामगार सेनेचे शहर प्रमुख गौरव ढोणे, सुनिल भोसले आदींनी मंगळवारी (दि. ७) अन्नधान्य वितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनात कामानिमित्त आलेले नागरिकही सहभागी झाले होते. कार्यालयाने संकेतस्थळ संथगतीने काम करते. मध्येच बंद पडते, रिपोर्ट डाऊनलोड होत नाही. आरसीएमएस प्रणालीत अनेक अडचणी येत असल्याचे स्पष्ट करत येत्या आठ दिवसात सर्व प्रक्रिया सुरळीत सुरू करण्याचे आश्वासन आंदोलकांना दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे आनंद राठोड यांनी सांगितले.

# कांद्याची परस्पर विल्हेवाट लावत ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाची सव्वा सहा लाखांची फसवणूक

नगर - विश्वासाने व्यापाऱ्याकडे पोहोच करण्यासाठी दिलेल्या सुमारे सव्वा सहा लाख रुपये किंमतीच्या १२ टन कांद्याची मालट्रक चालकाने परस्पर विल्हेवाट लावत नगरमधील ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात मालट्रक चालकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एमआयडीसी येथील दिल्ली हरियाणा रोडलाईन ट्रान्सपोर्टचे व्यवस्थापक नवीनकुमार चौधरी (मूळ रा. रामगड, राजस्थान, हल्ली रा. एमआयडीसी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून ते संपूर्ण देशभरात मालाची वाहतूक करत असतात. त्यांच्याकडे राजस्थानच्या जयपूर येथील राजधानी ट्रेडिंग कंपनी यांना १२ टन कांदा पोहोच करण्याचे काम मिळाले.

त्यावेळी त्यांच्या कार्यालयात मालट्रक चालक सुरेंद्र भीमसिंग पुनिया (रा. फत्तेहबाद, हरियाणा) हा मालट्रक घेवून आला व मी सदरचा कांदा जयपूर येथे पोहोच करतो म्हणाला. फिर्यादी आणि चालक पुनिया यांची ट्रान्सपोर्ट व्यवसायाच्या निमित्ताने ओळख असल्याने त्यांनी विश्वासाने पुनिया याच्याकडे ६ लाख २४ हजार रुपये किंमतीचा १२ टन कांदा जयपूरला पोहोच करण्यासाठी दिला. मात्र त्याने सदर कांदा जयपूर येथे पोहोच न करता त्याची परस्पर विल्हेवाट लावून फिर्यादीच्या ट्रान्सपोर्ट कंपनीची आर्थिक फसवणूक केली आहे.

मालट्रक चालक पुनिया याच्याशी वारंवार संपर्क साधूनही त्याच्याशी संपर्क न झाल्याने शेवटी व्यवस्थापक नवीनकुमार चौधरी यांनी सोमवारी (दि.६) रात्री एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी मालट्रक चालक सुरेंद्र भीमसिंग पुनिया याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६ (२), ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ.नेहूल हे करत आहेत.

मकरसंक्रांत
निमित्त ₹10/-
वाण उपलब्ध
प्लास्टिक, स्टिल, सिल्वर कोटेड, क्रॉकरी व तसेच सर्व प्रकारच्या गृहउपयोगी वस्तूंसाठी एकमेव दालन
Franchise by
DB VENTURES
One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD
Opp. Gold's Gym, TV Centre, Savedi Road, Ahilyanagar
सोमवार विश्रांती

सुरक्षा तुमची सर्व्हिस आमची
CCTV Camera Set 9999/-
नियम व अटी लागु*
घर, दुकाने, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज
गोल्डन एंटरप्रायजेस
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919



स्व. नरेंद्र (खन्नुशेठ) पंड्या
स्व.दि. ७/१/२००८

१७ वे पुण्यस्मरण

आपल्या संस्काररूपी स्मृतींचा स्मृतीगंध आजही दरवळत आहे.
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे.

।। पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण श्रद्धांजली ।।

मुंजोबा स्वीटस्
पंकज नरेंद्र पंड्या
व पंड्या परिवार
मार्केट यार्ड चौक, स्टेशन रोड, अहमदनगर.
फोन: २३४६८४८.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 02 जानेवारी ते 09 जानेवारी 2025
KRAVEN THE HUNTER 09:15 AM I 02:00 PM
BABAY JOHN 11:30 AM I 10:15 PM
Y J Y D 09:30 PM
MUFASA - 3D 11:45 AM I 04:30 PM
MARCO 08:45 AM I 02:30 PM 06:45 PM
PUSHPA-2 07:30 AM I 11:05 AM 02:45 PM I 06:20 PM 10:00 PM
MUKKAM POST BOMBILWAADI 05:15 PM
VANVAAS 07:15 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

रामबाण उपाय
बिना ऑपरेशन उपाय
मिनिटात वघळलेले कान चिटकवा
टॅटु, कपाळचे गोंधन पूसून टाका.
मोस काढणे व्यसने सोडवा
मावा दारुमिश्रीसाठी स्प्रे,
सर्दीसाठी स्प्रे पिंपल्स काळे डाग,
संपर्क : डॉ. मंजुषा
7507718246

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 6 JAN - 8 JAN 2025
पुष्पा - २ 10.40AM I 06.40PM 02.20PM I 10.00PM
क्रेवेन - द हंटर Hindi 09.30AM
ये जवानी है दिवानी 09.30AM I 03.30PM 07.05PM I 10.15PM
बेबी जॉन 10.50PM
मु.पो. बोंबिलवाडी 02.30PM
मुफासा (3D) Hindi 12.00PM I 08.35PM
मारको 12.35PM I 06.00PM
द रॅबिट हाऊस 04.30PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office
Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife™ MINIPLEX

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## पुस्तक महोत्सव... चांगला पायंडा

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

नुकतेच विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात भव्यदिव्य असे पुणे पुस्तक महोत्सव झाले. पुण्यावर देवी सरस्वतीचे काही खास व अधिक प्रेम असेल. त्यात तेथील प्रज्ञावंत, विचारवंत व रसिक पुणेकर आपल्या विविध कला, साहित्यिक व ज्ञानवर्धक कार्यक्रमांनी वेगळेपण जपतात.

पुस्तक महोत्सव हे नव्या पिढीला नव्याने पुस्तकांप्रती आकर्षक करण्यास चांगला प्रयोग व पायंडा ठरतोय. सोशल मिडीया व ऑडीट बुकच्या जमान्यात पुस्तकांचीही क्रेझ वाढावी म्हणून हा पुस्तक महोत्सव प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी होत राहणे गरजेचे आहे.

आपल्या नगरलाही ग्रंथालय विभागातर्फे विशेषतः विद्यार्थी व वाचकांसाठी वाचन महोत्सव झाला. खरंतर आपल्या नगर शहरातही चोखंदळ वाचक, रसिक व जाणकार प्रज्ञावंतांची मांदियाळी आहे. मसाप, रसिक व संबंधित अन्य संस्थांनीही थोडे अधिक परिश्रम करून मोठ्या, भव्यदिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस ठरवला पाहिजे. पुण्याच्या पुस्तक महोत्सवाचा अभ्यास, माहिती व त्यांच्या आयोजकांशी बोलून, दर्दी प्रायोजक शोधून नगरकरांची सांस्कृतिक व वाचनाची भूक शमवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.



नगरचे साहित्य संमेलन, नाट्यसंमेलन होऊन अनेक वर्षे होऊन गेलीत. पुन्हा एकदा नगरचे नाव या क्षेत्रात पुढे यावे. ज्ञानेश्वरी व संत अध्यात्माची नगरी परंपरा पुन्हा वैभवशाली व प्रगतीपथावर राहो ही एक वाचक, रसिक म्हणून शुभकामना.





नगर पुणे महामार्गावर पुढे चाललेल्या ट्रेलरला एस टी बसने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात बस ची झालेली दुर्दशा.

# भरधाव वेगातील एसटी बस ट्रेलरला पाठीमागून धडकली

### चालकासह ८ प्रवासी जखमी, नगर - पुणे महामार्गावरील घटना

नगर - नगर हून पुण्याकडे चाललेल्या भरधाव वेगातील एसटी बसने पुढे चाललेल्या ट्रेलरला पाठीमागून जोराची धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात बस चालकासह ७ प्रवासी असे ८ जण जखमी झाले आहेत. या अपघातात बसचे प्रचंड नुकसान झाले असून बस मधील प्रवासी सुदैवाने बालंबाल बचावले आहेत. नगर-पुणे महामार्गावर चास (ता.नगर) गावच्या शिवारात भारत पेट्रोल पंपासमोर रविवारी (दि.५) सायंकाळी हा अपघात झाला.

या अपघातात बस चालक उमेश प्रकाश सोनवणे (वय ३६, रा. शिरूर, ता. अंमळनेर, जि. जळगाव) तसेच प्रवासी बंडू शांताराम पवार (वय २८), पूजा बंडू पवार (वय २५), आर्यन बंडू पवार (वय २ वर्ष, सर्व रा. खडकी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव), लक्ष्मीबाई धोंड पाटील (वय ७५, रा. पारोळा, ता.जळगाव), फातिमा बाबूमिया जहागीरदार (वय ७०, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), आयेशा शाकीर सय्यद (वय ३०), अफजल शाकीर सय्यद (वय ९, दोघे रा. हडपसर, पुणे) असे जखमी झाले आहेत. याबाबत ट्रेलर चालक समसाद खान (रा. छत्तीसगड) याने सोमवारी (दि.६) सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून बस चालक उमेश प्रकाश सोनवणे याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रेलर चालक समसाद खान हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर (क्र. सीजी ०७ सी ए ६१३८) घेवून रविवारी दुपारी ३.३० च्या सुमारास नगरहून पुण्याकडे जात असताना चास शिवारात पेट्रोल पंपासमोर पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या अंमळनेर ते पुणे एसटी बसच्या चालकाचे बस वरील नियंत्रण सुटून बस ट्रेलरवर आदळली. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. नगर तालुका पोलिस व महामार्ग पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला काढत वाहतूक सुरळीत केली.

### खाजगी बसची पिकअपला धडक, ३ जखमी

दरम्यान रविवारी दुपारी ३ च्या सुमारास नगर पाथर्डी रोडवर मेहेकरी गावच्या शिवारात आणखी एक अपघात झाला. नगरहून पाथर्डीकडे चाललेल्या पिकअप गाडीला समोरून भरधाव वेगात आलेल्या खाजगी आराम बसने जोराची धडक दिली. या अपघातात पिक अप चालक प्रवीण घनश्याम नेहूल व चालकाशेजारी बसलेले आदिनाथ चंद्रभान नेहूल, सविता आदिनाथ नेहूल (सर्व रा. जवखेडे दुमाला, ता. पाथर्डी) हे जखमी झाले आहेत. याबाबत आदिनाथ नेहूल यांनी सोमवारी (दि.६) सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून खाजगी बस (क्र. एमएच ०४ जी पी १२३२) वरील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मालमत्ता करावरील शास्तीमध्ये जानेवारी अखेर १०० टक्के सवलत

### फेब्रुवारी अखेर ७५ टक्के, २२ मार्च अखेर ५० टक्के सवलत

नगर - महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यावर नियमानुसार शास्ती आकारली जात असल्याने नागरिकांच्या मालमत्ता करावरील थकबाकीचा बोजा वाढत आहे. महापालिकेवरही आर्थिक ताण वाढत असून महापालिकेच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे थकबाकीदारांना दिलासा देण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ८ जानेवारी ते ३१ जानेवारी अखेरपर्यंत मालमत्ताधारकांना शास्तीमध्ये १०० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच १ ते २८ फेब्रुवारी अखेरपर्यंत ७५ टक्के, तर १ ते २२ मार्च अखेर ५० टक्के सवलत दिली जाणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिकेने कराच्या थकबाकी वसुलीसाठी जप्ती मोहीम सुरू केली आहे. थकबाकीदारांना नोटीस बजावण्यात येत आहेत. बहुतांश प्रकरणे लोक आदालतमध्ये घेऊन त्यात तडजोड करून मोठ्या प्रमाणात वसुली केलेली आहे. मागील तीन-चार वर्षात महानगरपालिकेने लोक अदालत च्या माध्यमातून सुमारे ३५ कोटी रुपयांची वसुली केली आहे. यंदा मार्च महिन्यामध्ये लोकअदालत होणार आहे. मात्र, तत्पूर्वी थकबाकीदारांना संधी देण्याच्या दृष्टीने व महानगरपालिकेची जास्तीत जास्त वसुली होण्यासाठी शास्तीमध्ये तीन टप्प्यात सवलत जाहीर करण्यात आली आहे.

मालमत्ताधारकांनी त्यांच्याकडील थकीत मालमत्ता कराचा भरणा ३१ जानेवारी अखेर केल्यास त्यांना शास्तीमध्ये १०० टक्के सवलत मिळणार आहे. त्यानंतर २८ फेब्रुवारी अखेरपर्यंत कर भरणाऱ्याना शास्तीमध्ये ७५ टक्के व १ ते २२ मार्च अखेर कर भरणाऱ्यांना शास्तीमध्ये ५० टक्के सवलत मिळणार आहे. थकबाकीदार मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा व थकीत कराचा भरणा करावा. महानगरपालिका जप्ती कारवाई सुरु करणार असून कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी लवकरात लवकर कराचा भरणा करावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.



अतिक्रमण धारकांशी खा. निलेश लंके यांनी संवाद साधला. यावेळी योगीराज गाडे व नागरिक. (छाया - धनेश कटारिया)

# श्रीमंत आणि गरिबांमध्ये भेदभाव नको गोरगरीब विक्रेत्यांना लक्ष्य करू नका

### खासदार निलेश लंके यांचा महानगरपालिकेला इशारा

नगर -आहिल्यानगर शहरात महानगरपालिका अतिक्रमण मोहीम राबवत असून, रस्त्याच्या कडेला फळविक्री करणारे, हातगाडीवाले, चहावाले यांसारख्या गरीब लोकांना उगाच लक्ष्य केले जात आहे. या मोहिमेमुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर झाला आहे. हे विक्रेते कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम न करता फक्त रस्त्याच्या कडेला बसून आपल्या कुटुंबासाठी रोजीरोटी मिळवत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे प्रत्येकाला व्यवसायासाठी स्वतंत्र जागा मिळणे शक्य नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

खा. निलेश लंके यांनी या रस्त्यावरील फळविक्रेत्यांची भेट घेतली आणि त्यांच्या परिस्थितीबद्दल संवेदनशीलता व्यक्त केली. त्यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संवाद साधत गरीब लोकांना त्रास देणे तात्काळ थांबवावे, असा आदेश दिला. हे मेहनती गरीब लोक दिवसरात्र कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत. त्यांना हटवून त्यांच्या पोटावर पाय देणे अमानवी आहे. नो-हॉकर्स झोनमध्ये नियम लागू करा, पण ज्यांच्याकडे कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम नाही त्यांना लक्ष्य करू नका, असे त्यांनी भावनिकपणे सांगितले.

खा. लंके यांनी स्पष्ट शब्दांत महानगरपालिका अधिकाऱ्यांना सांगितले की, गरीबांना हटवून त्यांची उपजीविका काढून घेणे हा भेदभाव आहे. जर गरीबांवरच कारवाई केली जाणार असेल, तर त्यांच्या कुटुंबांचे पालनपोषण कसे होणार? महानगरपालिका आयुक्त त्यांना अन्न पुरवणार नाहीत. त्यामुळे या गरीब विक्रेत्यांना त्यांच्या हक्काचे काम करण्याची परवानगी द्या.खा. निलेश लंके यांच्या या हस्तक्षेपामुळे गरीब विक्रेत्यांना आधार मिळाला आहे. त्यांच्या संघर्षाला एक दिशा मिळाली असून प्रशासनाने आता संवेदनशील होऊन योग्य ती भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# घंटागाडीचे ठेकेदार व कर्मचाऱ्यांची कचरा वेचकावर अरेरावीची भाषा

### कचरा वेचकावर उपासमारीची वेळ, कागद, काच, पत्रा, कष्टकरी पंचायतच्या वतीने मनपा आयुक्त यांना निवेदन



कष्टकरी पंचायतच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

नगर - शहर हद्दीमध्ये व उपनगरात पडणारा कचरा संकलन करण्याचे काम एका खाजगी ठेकेदाराला मनपाने दिलेले आहे. या ठेकेदाराचे गुंड प्रवृत्तीचे लोक या कचरा वेचकांना सुका कचरा गोळा करण्यास मनाई करत आहे व त्यांना शिवीगाळ करून घंटागाडीमधील सुका कचरा भरल्यास तुला कचरा संकलनाच्या कॉम्पॅक्टरमध्ये ढकलून देईल अशी धमकी देत आहे व घंटागाडीवरील कामगारास दरमहा पगार चालू असून देखील तो सुका कचरा गोळा करून त्यातूनही पैसे कमवत आहे. त्यामुळे सदरील कचरा वेचकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

नगर शहरांमध्ये सुमारे ३०० कचरा वेचक हे सुका कचरा गोळा करण्याचे काम करतात हे मनपाचे कर्मचारी नाहीत परंतु हे शहरासह उपनगरातील स्वच्छतेच्या कामास मदतच करत असतात. घंटागाडीमध्ये सुका कचरा घेण्यास गेल्यास तेथील लोक दमबाजी करतात. कचरा वेचक हे गेल्या ३०-४० वर्षापासून कचरा वेचकाचे काम करत आहे. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत गेल्या अनेक वर्षापासून या कामगारांना महापालिका घनकचरा व्यवस्थापनामध्ये समावेश करून घ्यावा यासाठी काम करत आहे. महापालिकेमार्फत कचरा वेचकांना ओळखपत्र मिळणे संदर्भात कार्यवाही चालू आहे. मात्र ठेकेदारांमार्फत १०० ते १५० परप्रांतीय कामगार आणून सदर काम केले जाते आणि स्थानिक कामगारांना मात्र रोजगारापासून वंचित ठेवले जाते. राज्य सरकार असो की केंद्र सरकार असो यांच्यामार्फत कचरा वेचकांना घनकचऱ्यात समावेश करून घेण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय देण्यात आलेले आहे.

परंतु शासकीय नियमास गाळून परप्रांतीय कामगार आणून स्थानिक कामगारांवर अन्याय केला जात असल्याने या कचरा वेचकांना दमबाजी करणाऱ्या ठेकेदारावर व गुंड व्यक्तींवर कारवाई करून कचरा वेचक कामगारांना घंटागाडीमधील सुका कचरा गोळा करण्यास परवानगी देण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, कचरा वेचक मंदा शेलकर, लक्ष्मी राजपूत, कीर्ती गायकवाड, मीना वैरागर, शितल चांदणे, अनुसया सोनवणे, सविता शिरोळे, लखाबाई शिंदे, कालींदा थाडगे, मंगल चखाले, सुनिता उल्हारे, मनीषा घोरपडे, अनिता लोंढे, मंगल पाथरे, सागर घुडे, विकास धाडगे, विकास वाल्हेकर, बाळू खुडे, अजय गायकवाड, पवन शेरकर आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर महानगरपालिका वगळून पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, वर्धा, मुंबई अशा सर्व महानगरपलिकेने कचरा वेचकांना घनकचरा व्यवस्थापनामध्ये समावेश करून घेतलेले आहे.

# जाती जमाती प्रवर्गातील नागरिकांचे, सफाई कामगारांचे प्रश्न मार्गी लावा

### आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या प्रशासनाला सूचना



महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी अहिल्यानगर शहरात बैठक घेतली. याप्रसंगी त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना आयुक्त यशवंत डांगे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा सह आयुक्त प्रशांत खांडेकर आदी. (छाया- लहू दळवी)

नगर - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी सोमवारी अहिल्यानगर शहरात घेतलेल्या बैठकीत सफाई कर्मचारी व नागरिकांच्या तक्रारींचा आढावा घेऊन जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, महानगरपालिका व नगरपालिकांना अनुषंगिक उपाययोजनांच्या सूचना दिल्या.

बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलिस अधीक्षक राकेश ओला, महानगरपालिका आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे, जिल्हा सह आयुक्त प्रशांत खांडेकर आदी उपस्थित होते. बैठकीत लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांना नियुक्त्या देणे, कर्मचाऱ्यांचे इतर सेवाविषयक प्रश्न आदींवर चारचाचौन प्रशासनाला दिले सूचना देण्यात आल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचा आढावा घेऊन रिक्त जागा, लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार करावयाच्या नियुक्त्या, सफाई कामगारांना दिल्या जाणाऱ्या सुविधा आदींची माहिती ॲड. लोखंडे यांनी घेतली. सफाई कामगार व अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील नागरिकांचे प्रश्न, समस्या, त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे आदेश त्यांनी जिल्हा प्रशासन, पोलिस आहेत.

# दारू सोडवण्यासाठी मोफत तपासणी शिबीर



डॉ. रोहित गुगळे

नगर - वाढती व्यसनाधिनता ही एक मोठी सामाजिक समस्या बनत चालली आहे. अनेकदा इच्छा असूनही व्यसन सुटत नाही. दारू, गुटखा, सिगारेट, तंबाखू इत्यादी व्यसनांपासून होमिओपॅथी उपचार पध्दतीने मुक्तता मिळणे शक्य आहे. यासाठी होमिओ हेल्थ केअर येथे मोफत होमिओपॅथी तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. ८ ते १७ जानेवारी या कालावधीत शहरातील आसरा स्टेशनरी जवळ महाजन गल्ली येथील व बुरुडगाव रोडवरील वैभव हॉटेलसमोरील क्लिनिकमध्ये सदर शिबिर होणार आहे, अशी माहिती होमिओपॅथी व पुष्पऔषधी तज्ज्ञ डॉ.रोहित गुगळे व डॉ.सपना गुगळे यांनी दिली.

या शिबिरात दारू सोडविण्यासह व्यसन मुक्तीवर मोफत तपासणी व सवलतीच्या दरात औषध दिली जाणार आहेत. व्यसनी व्यक्तीस न सांगता होमिओपॅथी औषधे देता येतात. औषधांचे कुठलेही साईड इफेक्ट नसून मोफत समुपदेशनही केले जाणार आहे. दारू तसेच अन्य व्यसनांमुळे व्यक्तीच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतात. कौटुंबिक, सामाजिक आयुष्यही अस्थिर बनते. त्यामुळे सामाजिक जाणीवेतून डॉ.गुगळे यांनी होमिओपॅथीच्या माध्यमातून दारूसह अन्य व्यसनापासून मुक्ती मिळावी यासाठी या शिबिराचे आयोजन केले आहे.

डॉ.गुगळे ऑनलाईन पध्दतीनेही उपचार मार्गदर्शनासाठी उपलब्ध असतात. माहितीसाठी संपर्क : ९८२३५६३६४३.

# गृहिणी

## आरोग्य

### आक्रोड खा हेल्दी रहा

अक्रोडचा समावेश तुमच्या नेहमीच्या आहारात केला पाहिजे. आणि फक्त २ अक्रोड नियमितपणे खाणे तुमच्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरू शकते.

अक्रोडमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड मेंदूच्या पेशी निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि शिकण्याची क्षमता वाढवते.

## पाककला

### चविष्ट मठ्ठा

**साहित्य** : गोड दही, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, आले, मीठ, साखर

**कृती** : मठ्ठा दाट अगर पातळ पाहिजे असेल, त्या मानाने दह्यात पाणी घालावे. मठ्ठा साधारणपणे फार पातळ नसतो. पाणी घालून दही घुसळून घ्यावे. नंतर आले, मिरच्या व कोथिंबीर ही सर्व वाटून घुसळलेल्या ताकाला लावावी व त्यात चवीप्रमाणे मीठ व साखर घालावी. हवे असल्यास यामध्ये नारळाचे दुधही घालू शकता.

## वास्तू

### शैक्षणिक संस्थेसाठी

* शैक्षणिक संस्थेसाठी ब्राम्हणी प्रकारातील चव-मधुर, सुगंध सुमधुर व चव गोडसर असणारी भूमी सर्वोत्तम. यामुळे शिक्षक व विद्यार्थी दोघांचे विद्या देणे आणि घेणे अतिशय उत्कृष्ट दर्जाचे होत असते.
* प्रवेशद्वार उत्तर ते पूर्व भागात घेणे आवश्यक.
* संस्थेचे पटांगण उत्तर ते पूर्व भागात घेण्याने हा भाग हलका मोकळा राहतो.

## सल्ला

जाड व्यक्तींनी बारीक डिझाईनचे कपडे वापरावेत; तसेच उभ्या डिझाईनचे कपडे वापरल्याने जाडी कमी वाटून उंची अधिक दिसते.

## सौंदर्य

अती नाजूक त्वचेसाठी संवेदनशील वॅक्स मिळतात. जसे की, ॲलोव्हेरा वॅक्स, स्टॉबेरी वॅक्स, चॉकलेट व गोल्ड वॅक्स असे वॅक्स वापरल्याने त्वचा सुरक्षित राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ८ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, अश्विनी १६।३०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आज मार्गी लागेल.

**वृषभ** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल.

**मिथुन** : हितशत्रू डोके वर काढतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. मागील उधारी वसुल होईल.

**कर्क** : वाहने व उपकरणे बिघडतील. मागील उधारी अजून वाढेल. दिवस कंटाळवाणा वाटेल.

**सिंह** : दिवस आनंदात जाईल. सार्वजनिक ठिकाणी मानसन्मान प्राप्त होईल.

**कन्या** : कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. आर्थिक लाभ होईल.

**वृश्चिक** : आजचा दिवस आपणास व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील.

**मकर** : प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणेल.

**कुंभ** : आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. जुन्या ईच्छा अकांक्षा पूर्ण होतील.

**मीन** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### विचित्र पोषाख

राजू वर्गात येत आसताना शिक्षकांचे त्याच्याकडे सहज लक्ष गेले. पुढून शर्ट पॅन्टमध्ये खोचला होता तर मागून पूर्ण बाहेर होता.

'हा काय वेंधळपणा! असा काय विचित्र पोशाख करुन आला आहेस?' शिक्षकांनी विचारणा केली.

'सर तुमच्यापासून काय लपवायचं? परिस्थिती अशी आहे की शर्ट पुढून फाटला आहे आणि पॅन्ट मागून, मग काय करणार ?'

## जागतिक आश्चर्ये


### युनायटेड नेशन्स मुख्यालय

युनायटेड नेशन्सचे मुख्यालय १९५२ मध्ये बांधून पूर्ण झाले. ३९ मजले असलेली ही गगनचुंबी इमारत आहे. त्यात शेकडो ऑफिसेस आहेत. युनायटेड नेशन्स ही आंतरराष्ट्रीय संस्था सन १९४५ मध्ये उदयास आली. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात परस्पर सौख्य आणि शांतता नांदावी म्हणून यूएनची सुरुवात झाली.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०८८

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दीन; रंक ४) सभेचा प्रमुख ७) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा, शस्त्रे वगैर ८) होडी, नाव वगैरे उतरून जाण्याजोगी लहान खाडी ९) मंत्र्याच्या नावाअगोदर लावण्यात येणारा एक शब्द ११) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; नक्र १२) पूर्ण भरतीची वेळ १३) फिकीर; पर्वा १५) कवीची रचना; काव्य १६) आत न जाता; बाहेरून १९) धुमश्चक्री; गडबड २०) पडणे; नाश; पात २२) पतिव्रता; पार्वती २३) उसापासून बनणारा एक गोडपदार्थ

**उभे शब्द :-** १) अगदी गोल; वाटोळा २) एक केसाळ जंगली प्राणी ३) दुर्लौकिक प्राप्त झालेला; नाव खराब झालेला ४) टोळीचा प्रमुख ५) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास ६) धनुष्यबाण १०) नंतर; पुन्हा १२) सूट; डिस्काउंट १४) पश्चिम दिशा १७) अरबी भाषेत देव १८) वळण; वाकडा रस्ता १९) वाळ्याचे अत्तर २०) पंख; दुसरा २१) पाण्याचा मोठा प्रवाह; सरिता

### शब्दगंध क्र. ७०८७ चे उत्तर



# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अडचणी आयुष्यात नसतात तर मनात असतात, ज्या दिवशी मनावर मात कराल त्या दिवशी आपोआप मार्ग निघेल.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### तारे आपल्यापासून किती दूर आहेत?

आपल्याला आकाशात तारे दिसतात. ते आपल्या सूर्याप्रमाणेच कमीअधिक आकार असलेले तप्त वायूंचे गोळे असतात, हे आपल्याला ठाऊक आहेच. यांतले काही तारे बरेच तेजस्वी असतात तर काही अगदी अंधुकसे दिसतात.

या ताऱ्यांचे आपल्यापासूनचे अंतर प्रकाशवर्षात मोजले जाते. एक प्रकाशवर्ष म्हणजे प्रकाशाने एका वर्षात दर सेकंदास तीन लक्ष कि. मी. या वेगाने काटलेले अंतर. पृथ्वीच्या सर्वांत जवळचा तारा म्हणजे 'प्रॉक्झिमा सेंटॉरी' हा ४.२८ प्रकाशवर्षे दूर आहे तर अल्फासेंटॉरी हा दुसरा तारा ४.३७ प्रकाशवर्षे दूर आहे.

नुसत्या डोळ्यांनी ८० लक्ष प्रकाशवर्षे दूर असलेले तारे आपण बघू शकतो, तर दूरदर्शीच्या सहाय्याने आपण याहीपलीकडचे तारे पाहू शकतो.

यांतले काही तारे जास्त प्रकाशमान असतात तर काही कमी. हे जसे तो तारा आपल्यापासून किती दूर आहे यावर अवलंबून असते, त्याचप्रमाणे त्या ताऱ्याच्या तापमानावरही अवलंबून असते. या तापमानावर अवलंबून त्या ताऱ्यांचे रंगही बदलतात. लाल किंवा नारिंगी रंगाच्या ताऱ्यांचे तापमान पिवळ्या, हिरव्या, ताऱ्यांपेक्षा खूपच कमी असते.

आपला सूर्य पिवळा तारा आहे. त्याच्या पृष्ठभागाचे तापमान ६०००ओ से. आहे.

## मोर आणि बगळा

एका मोराने बगळ्याला पाहून आपला सुंदर पिसारा फुलवला व हा कोणी फालतू प्राणी आहे असे मनात आणून त्याला आपल्या रंगीत पिसाऱ्याचे सौंदर्य दाखवू लागला. त्याचा गर्व कमी व्हावा म्हणून बगळा त्याला म्हणाला,

'अरे, सुंदर पिसं हे तुझ्या मोठेपणाचे लक्षण असतं तर तुमची जात श्रेष्ठ आहे हे मी कबूल केलं असतं, पण मला वाटतं जमिनीवर चालून खेळ खेळण्यात, अन् नाचण्यापेक्षा आकाशात फिरण्याची शक्ती असणं हेच खरं मोठेपणाचं आहे!'

तात्पर्य - आपल्या अंगी असलेला गुण दुसऱ्याजवळ नसला म्हणजे त्याला हिणवावे असे जर असेल तर दुसऱ्याजवळच्या गुणासाठी त्याने आपल्याला का हिणवू नये ? सगळेच गुण एकाच माणसाजवळ असतात असे नाही म्हणून कोणी कोणा हिणवू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



सरीखे तुच्छ जीव पर कीं। परम संत कृपालसिंह जी महाराज के परम धाम सिधारने के पश्चात मेरी स्थिति बड़ी असहाय जैसी हो गई थी। कुछ सूझ नहीं रहा था कि कहाँ जाऊँ। अचानक किसी परिचित से सुना कि अब वक़्त के सतुगुरु संत दर्शनसिंह जी महाराज हैं। मुझे ऐसे लगा कि जैसे अंधे को आँख मिल गई हो। यह समाचार सुनकर दर्शन करने दिल्ली की ओर चल पड़ा। इससे पहले मैंने केवल एक बार ही दर्शनसिंह जी के दर्शन किये थे।

सावन-आश्रम पहुँचने पर मुझे तरह-तरह की बातें सुनने को मिलीं। कोई कुछ कह रहा था तो कोई कुछ, कोई अपनी ही बात करे जा रहा था कि दर्शनसिंह उत्तराधिकारी नहीं है। पर मेरी आँखें दर्शनसिंह जी महाराज को ढूँढ रही थीं। तभी मैंने देखा कि जहाँ महाराज दर्शनसिंह जी विराजमान थे, उनके पीछे की ओर शांतिमय

ज्योतिर्मय धारा प्रवाहित हो रही थी। मैंने कुछ बोलना चाहा, परन्तु महाराज जी ने प्यार से मुझे शांत रहने के लिए कहा। इसके पश्चात मैं वापिस

### वे दया सागर थे

अपने घर मेरठ आ गया। हम लोग उन दिनों प्रायः मेरठ, सावन आश्रम में एकत्रित होते रहते थे। इसी बीच पता चला कि तिलक नगर में बाबा सावनसिंह जी महाराज का जन्मदिन मनाने की तैयारियाँ हो रही हैं। मुझे भी मेरठ सत्संग केन्द्र की तरफ से वहाँ सेवा में भेजा गया। मुझे एक सेवादार, कीमतीलाल जी के संग रहकर सेवा करने का अवसर मिला, बल्कि यूँ कहिये कि महाराज जी के समीप रहने का सौभाग्य प्राप्त हुआ। कई बार काम अधिक हो जाने के कारण हम भोजन भी नहीं कर पाते थे तो इस पर महाराज जी बड़े प्यार से हमें खाने के बारे में पूछते और बड़ी दया करके अपने हाथों से प्रसाद देते।

१९८३ की एक घटना है। दफ्तर में मेरी ड्यूटी ठेकेदारों के बिल भुगतान करने की थी। गलती से एक बार मैंने बिल से अधिक भुगतान कर दिया। उस ठेकेदार ने वह बिल मुझसे और दूसरे अधिकारियों से पास भी करवा लिया। जब मामले की छानबीन हुई तो मुझे दोषी करार करके चार्ज शीट दे दी गई। उन्हीं दिनों मेरी पदोन्नति भी होनी थी।

मैं दयाल पुरुष महाराज दर्शनसिंह जी के चरणों में पहुँचा और सारी घटना की जानकारी दी। उन्होंने मुझे पुचकारा और कहने लगे, मुझे पता है। इतना सुनकर मेरी आँखों से आँसुओं की धारा बह निकली। महाराज जी ने अपने अनोखे एवं प्यारे अन्दाज़ में मुझे सांत्वना देते हुए कहा, चिंता न करो, महाराज जी दया करेंगे। जब मैं मेरठ वापिस आया और दफ्तर पहुँचा तो मेरे आश्चर्य का ठिकाना नहीं रहा जब मुझे पता चला कि मेरी चार्ज शीट वापिस ले ली गई है। इस प्रकार मैं अपना कार्य करता रहा। १९८५ में मेरी पदोन्नति हो गई और मेरा स्थानांतरण पटना हो गया। मुझे स्वाभाविक तौर पर चिंता हुई क्योंकि बच्चे अभी छोटे थे और नई जगह बहुत दूर थी। मैं तुरन्त महाराज जी के चरणों में पहुँचा और घटना की जानकारी दी।

महाराज जी मेरा स्थानांतरण आदेश देखा और बोले, 'इसमें तो झीीेंळेप ळर्पीेश्रींशव (पदोन्नति का सवाल) है, आपको जरूर जाना चाहिये। मेरी हिम्मत कुछ कहने की नहीं थी। बस इतना कहा, हुज़ूर जल्दी से बुला लेना। हज़ूर ने सिर हिला दिया और बोले, ठीक है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

ऐसी सोच को मन से निकाल दें कि आप शारीरिक एवं मानसिक दृष्टि से दुर्बल हैं या आप में कोई कमी आ गई है। मत सोचिए कि जिसे दूसरे लोग कर सकते हैं वह मैं नहीं कर सकता। मैं इस काम को अवश्य करूगां अन्यथा मर मिंटूगा और इस काम में जो भी अवरोध आएगा उस का हंसते हंसते मुकाबला करूगां। आप के शब्दों से यह प्रकट नहीं होना चाहिए कि आप भाग्यहीन अथवा मजबूर हैं। ऐसे भाव जो आप को किसी बन्धन में बांधते हैं उन्हें आपने मस्तिष्क से निकाल फेंके। लोग गलती क्या करते हैं, वह व्यक्तियों को निकाल फेंकते हैं।

वह व्यक्ति सास, बहू, पति, बास, साथी कर्मचारी, किसी संस्था के या कोई और करीबी लोग हो सकते हैं, जिन के सहारे से हम चल रहे होते हैं। हमें केवल और केवल लोगों के प्रति उठे बुरे विचारों को निकाल फेंकना है। आप को उस समय मन में शिव बाबा, ब्रह्मा बाबा, ईष्ट या और किसी स्नेही व्यक्ति को मन में देखना है और उनके प्रति मन में शुभ विचार रखना है, आप स्नेह के सागर हो / स्नेही हो। इस से आप के करीबी व्यक्तियों के प्रति उठे बुरे विचार खत्म हो जाएगें। बस यही तपस्या है, यही परहेज है, यही विधि है, यही नियम है, जीवन में आगे बढ़ने का, आंनद की अनुभुति करने का, भगवान से सर्व प्राप्तियों को अनुभव करने का।

### दिमाग की शक्ती

मस्तिष्क अनन्त शक्तियों का भंडार है। हर खजाने, हर रहस्य की कोई न कोई चाबी होती है, कोई न कोई पास वर्ड होता है। ऐसे ही दिमाग रूपी खजाने की भी एक चाबी है। कहते हैं वह चाबी प्राप्त करने के लिये कठोर तप की जरूरत होती है। तप हर इन्सान नहीं कर सकता। प्रत्येक व्यक्ति के अपने अपने लक्ष्य हैं। प्रत्येक व्यक्ति अपने क्षेत्र में आगे बढ़ना चाहता है। आप अध्यात्म क्षेत्र में आगे बढ़ना चाहते हैं, आप राजनीति में बढ़ना चाहते हैं, आप व्यापार में बढ़ना चाहते हैं, आप पढ़ाई में बढ़ना चाहते हैं, इन सब में दिमाग की जरूरत होती है। दिमाग को सक्रिय करने की तीन चाबिया हैं।

पहली चाबी है, भगवान को याद करना। भगवान को याद करने से दिमाग के केन्द्र खुल जाते हैं। भगवान को याद करने की अनेको विधियां हैं। कहते हैं अगर ८ घंटे हर रोज जीवन भर ध्यान का अभ्यास करें तो दिमाग के केन्द्र खुल जाते हैं। हम भगवान का रहस्य प्राप्त कर सकते हैं।

दूसरी विधि है अगर ६ घंटे हर रोज एक विषय पर पढ़ते रहें तो ५ साल में हम उस विषय के विशेषज्ञ बन जाएंगे। ये दोनो विधियां ही बहुत मुश्किल हैं। सभी व्यक्ति ये नहीं कर सकते। कुछ गिने चुने व्यक्ति ही कर सकते हैं।

दिमाग की शक्तियों को जागृत करने की तीसरी चाबी है कल्पना करना। यह बहुत आसान है। इसे प्रत्येक व्यक्ति कर सकता है। कितनी भी विपरीत परिस्थिति हो, दुःख हो, कैसा भी संग हो, बस आप को मन में उन चीजो को कल्पना में देखते रहना है, जो आप चाहते हैं। कल्पना शक्ति हमारे अवचेतन मन से जुड़ी हुई है, जहां अथाह शक्तियां भरी पड़ी हैं।

कल्पना करते ही हमारा अवचेतन मन काम करने लगता है। आप जिस क्षेत्र में बढना चाहते हैं उसके बारे अच्छी से अच्छी कल्पना करनी चाहिए। फिर कल्पना को वास्तविक दुनिया में लाने का पुरुषार्थ करना चाहिए। कल्पना से हम विश्व का कल्याण कर सकते हैं। आप कल्पना में भगवान को देखें और साथ में भारत के प्रधान मंत्री और राष्ट्रपति को देखें और भगवान को कहें आप शांति के सागर हैं, प्यार के सागर हैं। आप के ये विचार ईथर के माध्यम से प्रधान मंत्री और राष्ट्रपति को पहुंच जाएंगे और वह ऐसे कानून और नई योजनाएं बनाएंगे जिस से भारत का प्रत्येक व्यक्ति सुखी होगा।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**आहार योजना** : रोज एक सफरचंद खावे. तसेच रोज एक मोरावळा खावा. ६ व्या महिन्यानंतर दिवसभरातून रोज एक केळं खावे. तसेच सकाळी व संध्याकाळी शतावरी । कल्प दोन चमचे टाकून, गायीचे दूध प्यावे.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :**

प्रवाळ भस्म, कपर्दीक भस्म, सीतोपलादी चूण, च्यवनप्राश यांचा वापर करावा.

आवळा सरबत, लिंबू सरबत यांचाही वापर करावा. या सर्व प्रयोगामुळे लघवीची जळजळ कमी होते व भरपुर प्रमाणात लघवी होते.

**२३) योनी दाह** : फ

योनीभागावर जर जळजळ वाटत असेल, तर थंड पाण्याने योनीभाग धुऊन काढावा. तसेच गुलकंद, प्रवाळ भस्म व लोणी यांचे मिश्रण करून ते एक एक चमचा खावे. आवळा सरबत, डाळिंबाचा रस, ताक आहारामध्ये घ्यावे. औषधीं मध्ये चंदनासव, अल्का सिरप वापरावे. आयुर्वेदामध्ये साखर, मीठ, मैदा, साबुदाणा, डालडा पाच विषारी पदार्थ हे सांगितलेले आहेत. मधुमेह व रक्तदाब या आजारांपासून दूर राहायचे असेल, तर या पदार्थांचे सेवन न करणेच चांगले. जिथे साखरेचा वापर करावयाचा आहे तिथे गुळाचा वापर करावा, कारण

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

गुळाने रक्त वाढते. गव्हाच्या पीठापासून बनविलेला मैदा व रवा आहारामध्ये वापरावा. वनस्पती तूप (डालडा) ऐवजी गायीचे तूप आहारामध्ये वापरावे.

**२४) मधुमेह व रक्तदाब :** ज्यांच्या घराण्यामध्ये मधुमेह व रक्तदाब यांची आनुवंशिकता असेल त्या स्त्रीने गर्भधारणा होण्याआधीच डॉक्टरांकडून तपासणी व उपचार सुरू करावेत आणि नैसर्गिक सात्त्विक आहार, योगासने, पंचकर्मातून शरीरशुद्धी करून घ्यावी. पंचकर्मातून शरीरशुद्धी केल्याने बीजशुद्धी होऊन, गर्भावस्थेतील बाळांमध्ये पुढील आयुष्यात हे आजार होणार नाहीत व झाले तरी कमी प्रमाणात होतील याची दक्षता घेता येते. पंचकमीताल। वमन, विरेचन चिकित्सेने इन्सुलिन सिक्रिशनला चालना मिळते व त्यामुळे गभविस्थता मधुमेह हा आजार टाळला जातो. रक्तदाबावर नियंत्रण ठेवता येते. यासाठी आम्ही आयुर्वेदिक बेबी बाथ, उटणे बनविलेले आहे, त्याचा वापर करावा. स्नान झाल्यावर स्वच्छ फिक्या रंगाचे कपडे असावेत. उटणे लावल्यामुळे त्वचा नितळ, कांतीमय होते. स्नान करताना योनीमार्गाची व स्तनांची स्वच्छता करावी. स्तनाग्रे आतमध्ये असतील तर ती पुढे ओढावीत; त्यामुळे पुढे बाळाला दूध ओढण्यास त्रास होत नाही. स्नान केल्यावर मन प्रसन्न व आनंदित होते. मनाला ताजेतवाने वाटते. स्नानानंतर परमेश्वराचे नामःस्मरण करावे.

६. दूध पिणे (९.०० वा.) : १ ग्लासभर दूध शतावरीकल्प टाकून घ्यावे. काही गर्भवती स्त्रियांना सकाळी चहा प्यायची सवय असते, अशा वेळी शक्यतो आयुर्वेदिक तुळसयुक्त गवती चहा द्यावा. तो आरोग्याला चांगला असतो. चहा पावडर टाकून बनविलेला चहा पिण्यास टाळावे; त्यामुळे पित्त वाढून जळजळ होणे, उलटी होणे ही लक्षणे वाढतात. कुठलेही पेय किंवा दूध गर्भवतीने एकदम पिऊ नये. शांतपणे पेयाचा घोट घोट आस्वाद घेत प्यावे; त्यामुळे उलटी होत नाही.

७. पूजा-अर्चा (९.१० वा.) : परमेश्वराचे चिंतन करावे. पूजा करावी. जपमाळेवर स्तोत्र किंवा एखादा मंत्र जपावा. वारंवार मंत्र म्हटल्याने गर्भस्थ बाळाला तो मंत्र ओळखीचा वाटतो व प्रसूतीनंतर तो मंत्र म्हटल्यास बाळ रडायचे थांबते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आई वडीलांची साथ कधीच सोडू नका

**प्रवीणऋषीजी महाराज यांचे प्रतिपादन**



आनंदतीर्थ चिचोंडी शिराळ येथे देसरडा परिवाराच्यावतीने आयोजित विरमाता श्रीमती चंपाबाई दगडूरामजी देसरडा (घोडेगाव) यांच्या मातृपुजन व मातृभक्ती या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित हजारो भक्तांना संदेश देताना अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर परम प्रविणऋषिजी महाराज.

## आनंदतीर्थ येथे रंगला मातृपूजनाचा अनोखा सोहळा

नगर – जीवनाच्या वाटेवर बिकट प्रंसगी सर्वजण साथ सोडू शकतात पण आई वडील कधीच साथ सोडत नाहीत. स्वतःची सावली सुध्दा ज्यावेळी साथ सोडते त्या क्षणीसुध्दा आई वडील आपली सावली बनतात. म्हणून आई वडीलांची साथ कधीच सोडू नका. त्यांना वृध्दाश्रमाची वाट दाखवू नका असा अनमोल संदेश अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर परम प्रविणऋषिजी महाराज यांनी आनंदतीर्थ चिचोंडी शिराळ येथे देसरडा परिवाराच्यावतीने आयोजित विरमाता श्रीमती चंपाबाई दगडूरामजी देसरडा (घोडेगाव) यांच्या मातृपुजन व मातृभक्ती या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित हजारो भक्तांना दिला.

२०२६ चा चातुर्मास अहिल्यानगर येथे आनंदधाम या ठिकाणी प्रवर्तक कुंदनऋषी यांच्या सानिध्यात आणि अशोक बाबुशेठ बोरा यांच्या नेतृत्वात करणार असल्याचे प्रविणऋषीजी महाराज यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. शिवाजीराव कर्डीले, आ. विठ्ठलराव लंघे, गुरु आनंद तीर्थचे अध्यक्ष सतीश सुराणा, हार्दिक देसरडा यांची भाषणे झाली. या मातृपूजन सोहळ्याच्या निमित्ताने कार्यक्रमस्थळी रक्तदान शिबीर घेण्यात आले. तब्बल १२० रक्त पिशव्यांचे संकलन शिबिरात करण्यात आले.

पुणे येथील गायक रितिक ओस्तवाल यांनी आपल्या खास शैलीतून मातृभक्ती गाणी सादर केली. अत्यंत भावपुर्ण आणि मंगलमय वातावरणात विरमाता चंपाबाई दगडुराम देसरडा यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमीत्ताने आयोजित हा कार्यक्रम मधुर गायक श्री तिर्थेशऋषीजी म.सा, वाणीभुषण साध्वी प्रितीसुधाजी म.सा., सुनंदाजी म.सा., प्रितीदर्शनाजी म.सा. यांच्या मंगल उपस्थितीत झाला.

प्रमुख अतिथी म्हणून हभप रामेश्वर महाराज शास्त्री, हभप झरेकर महाराज, आ. संग्राम जगताप, माजी आ.संभाजीराव फाटके, माजी आ. पांडुरंग अभंग, गुरु आनंद तीर्थचे सर्व ट्रस्टी, अ‍ॅड. अभय ओस्तवाल, डॉ. राजेंद्र पिपाडा, राजेंद्र चोपडा, जैन कॉन्फरन्सचे अशोक बाबूशेठ बोरा, सी.ए.अशोक पितळे, विलास कटारिया, संतोष शेटीया, पंचगंगा शुगरचे प्रभाकर शिंदे, प्रा.भानुदास बेरड, सुवेंद्र गांधी, वसंत लोढा, किसनराव गडाख, मराठा महासंघाचे संभाजी दहातोंडे, भाजपचे उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, मुळा पाटबंधारेच्या सायली पाटील, माजी नगरसेवक संजय चोपडा, विपुल शेटीया, चिंचोडीचे सरपंच एकनाथ आटकर तसेच सर्व पदाधिकारी, अधिकारी, मित्र परिवारासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. याप्रसंगी घोडेगाव जैन श्री संघाच्यावतीने सन्मान पत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच तनिष्का संदीप देसरडा हिने मातोश्रीच्या काढलेल्या रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्वागत मदनलाल देसरडा, घोडेगावचे लोकनियुक्त सरपंच राजेंद्र देसरडा यांनी केले. तर भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोटेचा तसेच संतोष कुवाड यांनी केले. तर सोहळा यशस्वी करण्यासाठी सचिन देसरडा मित्र मंडळ आणि नेवासा सकल जैन श्री संघ, चिंचोडी श्रावक संघ, चिंचोडी ग्राम स्थ यानी विशेष परिश्रम घेतले.

### मिरी दिक्षा भूमीचा प्रश्न त्वरीत सोडविणार

उपाध्याय प्रवर परम प्रवीणऋषीजी म. सा यांनी राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांनी केलेली देव, गुरु, धर्म व समाजाची देशाची सेवा सदैव सर्वांना स्मरणीय आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांना राष्ट्रसंत म्हणून गौरविले आहे. त्यांची दिक्षाभूमी मिरी येथे असून ती जागा सरकारी आहे. जन्मभूमीप्रमाणे दिक्षाभूमीचाही विकास करावा ही जैन समाजाची २०–२५ वर्षांपासुन इच्छा आहे. परंतु ती जागा जर महाराष्ट्र शासनाने आमच्या समाजाच्या व दिक्षा भूमी विकास ट्रस्टला सपुर्त केली तर मोठे स्मारक त्या ठिकाणी समाज उभारेल. ती जागा उपलब्ध करुन देण्याची अपेक्षा आपल्या प्रवचनात व्यक्त केली. त्याला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय पातळीवर पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आ. शिवाजी कर्डिले यांनी त्वरीत हा प्रश्न सोडवुन त्याचे पालकत्व स्विकारण्याची घोषणा आपल्या भाषनात करताच हजारो भाविकांनी टाळ्यांचा कडकडात केला. मंत्री राधाकृष्ण विखे यांनी गुरु आनंद तीर्थला सर्व मदत करण्याचे आश्वासन देऊन विरमाता चंपाबाई देसरडा यांना शुभेच्छा दिल्या. देसरडा परिवाराच्यावतीने सर्वांसाठी गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.



जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे सी.ए. सृष्टी चंगेडिया हिचा सत्कार करण्यात आला.

# ध्येय निश्चित करण्याची शिकवण मुलांना लहान वयातच मिळावी

**आनंद मुथा यांचे प्रतिपादन, जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे सी.ए. सृष्टी चंगेडियाचा सत्कार**

नगर – घरातून प्रोत्साहन आणि पाठबळ मिळाल्यास मुलांना त्यांच्या स्वप्नाच्या दिशेने झेप घेता येते. लहान वयातच मुलांना ध्येय निश्चित करण्याची शिकवण दिली पाहिजे. सृष्टी चंगेडिया हिने हीच गोष्ट लक्षात घेऊन ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. सी.ए. सारखी अतिशय कठिण परिक्षा उत्तीर्ण होऊन तिने कुटुंबालाही नावलौकिक वाढवला आहे. मंडळाचे सभासद असलेल्या राजेश चंगेडिया यांची ती कन्या आहे. तिच्या या देदीप्यमान कामगिरीचा मंडळाला अभिमान आहे. तिच्या प्रेरणेने आणखी मुले मुली आपापली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतील, असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा यांनी केले.

नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाचे सभासद राजेश चंगेडिया यांची कन्या सृष्टी चंगेडिया ही नुकतीच सी.ए. फायनल परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. या यशाबद्दल तिचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सभासद बाबालाल गांधी, अजित गांधी, सत्येन मुथा, मनोज गुंदेचा, हेमंत मुथा, कुंतीलाल राका, ललित बनभेरू, प्रकाश गांधी, मनिष गुगळे, सुरेश गांधी, विनोद भंडारी आदी उपस्थित होते.

राजेश चंगेडिया म्हणाले, जय आनंद महावीर युवक मंडळ एक मोठा परिवार आहे. प्रत्येकाच्या कुटुंबातील मुलांनी कर्तृत्व सिद्ध केल्यावर त्यांचे आपुलकीने कौतुक केले जाते. सर्व जण एकत्र आनंद साजरा करतात. सृष्टीने शालेय दशेतच सी.ए. होण्याची जिद्द बाळगून अभ्यास केला. वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून तिने हे यश संपादित केले आहे.

सृष्टी चंगेडिया म्हणाली, घरातील वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि मंडळाच्या शुभेच्छांमुळे मला माझे स्वप्न साकारता आले. आज झालेला सत्कार मला आणखी मोठी भरारी घेण्यासाठी प्रोत्साहन देणारा आहे.

शेवटी कुंतीलाल राका यांनी आभार मानले.



महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन पुणे दौऱ्यावर आले असताना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या शिष्टमंडळाने त्यांची पुणे एयरपोर्ट वर भेट घेऊन त्यांना नववर्षाच्या शुभेच्छा देऊन संस्थे द्वारा जगभरात १४३ देशात शिकविल्या जाणाऱ्या ध्यानधारणे विषयी मार्गदर्शन केले. यावेळी ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके, बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका बी के डॉ. त्रिवेणी, अभिनेत्री बी के डॉ. ईशा अगरवाल व बी के आशा दीदी यांनी राज्यपालांना ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली.

# ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी शूटिंगसाठी अहिल्यानगरच्या रोहित वाघ याची निवड

नगर – पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी शूटिंग स्पर्धेसाठी सूर्यदत्ता इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) च्या एमबीए प्रथम वर्षातील विद्यार्थी रोहित राजेंद्र वाघ याची निवड झाली आहे. रोहित २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात पुण्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. बालेवाडी शूटिंग रेंज येथे झालेल्या प्रादेशिक स्पर्धेत रोहितने चौथ्या क्रमांकाचे स्थान मिळवले होते.



यापूर्वी, चेन्नई (तामिळनाडू) येथे आयोजित ३३ व्या ऑल इंडिया जी. व्ही. मावळणकर शूटिंग स्पर्धेत रोहितने ५० मीटर गटात कांस्यपदक पटकावले होते. आता तो नेशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय) तर्फे दिल्लीतील डॉ. करणीसिंग शूटिंग रेंज येथे होणाऱ्या ६७ व्या राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेत सहभागी होणार आहे.

रोहितला शिवछत्रपती पुरस्कार विजेते शिवराज ससे व सविता मताने यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या प्रयत्नांमुळे तो यशस्वी वाटचाल करत आहे. सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया तसेच विद्यार्थ्यांचे शिक्षक व पालक यांनी रोहित वाघचे अभिनंदन केले आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, सूर्यदत्ता संस्थेमध्ये नेहमीच क्रीडा आणि फिटनेसला प्रोत्साहन दिले जाते.

# सुसज्ज रेटीना आणि जबड्याचे सुपर-स्पेशालिटी हॉस्पिटलची सुरुवात

**आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन**



नगरमध्ये सुसज्ज रेटीना आणि जबड्याचे सुपर–स्पेशालिटी हॉस्पिटलची सुरुवात करण्यात आली.

नगर – आज नेत्र पटल व जबड्याच्या रुग्ण सेवेत डॉ. क्षितीज तांबोळी आणि डॉ. अर्चना सिंह तांबोळी यांच्यामुळे अहिल्यानगरीतील नागरिकांना पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज उरली नाही. अत्यंत आधुनिक आणि आकर्षक क्लिनिक तसेच ऑपरेशन थिएटरची सोय डॉ. तांबोळी परिवाराने आपल्यासाठी केलेली आहे, असे या प्रसंगी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले.

डॉ. तांबोळी मल्टी–स्पेशालिटी हॉस्पिटलच्या अंतर्गत CREST EYE आणि ORO-FACIAL क्लिनिकचे उद्घाटन आ. संग्राम जगताप, डॉ. हेमंत मूर्ती, डॉ. मनोज सासवडे, डॉ. मनीष बापये यांच्या हस्ते झाले.

डॉ. हेमंत मूर्ती यांनी असे सांगितले की डॉ. क्षितीज हे काही वर्षापूर्वी माझे अत्यंत हुशार विद्यार्थी होते आणि त्यांनी आता नगरसारख्या ठिकाणी आपले परिपूर्ण केंद्र सुरु केले आहे, हे पाहून मला खूप आनंद झाला. तांबोळी परिवाराची पेशंटला उत्तम सेवा देण्याची प्रथा डॉ. क्षितीज आणि अर्चना हे एका वेगळ्याच उंचीला नेतील याबाबत मला कोणती ही शंका नाही.

डॉ. मनोज सासवडे यांनी या केंद्रासाठी डॉ. क्षितीज आणि डॉ. अर्चना यांनी अत्यंत आधुनिक आणि योग्य यंत्र सामुग्री निवडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. डॉ. क्षितीज यांनी RIK बेंगलोर, LV प्रसाद हैद्राबाद, तुलसी आय नाशिक, एशियन आय इन्स्टिट्यूट आणि लेसर सेंटर, मुंबई अशा संस्थामध्ये गेले काही वर्षे अनुभव घेऊन अहिल्यानगर आणि आजूबाजूच्या २०० किलोमीटर परिसरातील जनतेसाठी आपल्या अनुभवाचा फायदा करून देण्याचे ठरवले आहे, हा नगरवासियांसाठी आनंदाचा क्षण आहे.

डॉ. मनीष बापये यांनी CREST EYE व ORO FACIAL क्लिनिकला शुभेच्छा देताना डॉ. हे सर्जरी मध्ये निष्णात असून त्यांनी या क्षेत्रात अनुभव घेतल्यानंतर आपल्या गावातील लोकांना याची गरज असल्याचे जाणून सर्व सुविधायुक्त क्लिनिक सुरु केल्याबद्दल तांबोळी क्लीनिकचे अभिनंदन केले.

या क्लिनिकमध्ये मधुमेह व रक्तदाब रुग्णांसाठी नेत्र तपासणी, कमी दिवसांच्या बाळाची नेत्र पटल तपासणी, इंजेक्शन थेरेपीद्वारे नेत्र पटल आजारांवर उपचार, मार लागलेल्या डोळ्याचे व्यवस्थापन, गुंतागुंतीची मोतीबिंदू शस्त्रक्रिया, उतार वयातील नेत्र पटलाचे उपचार, आधुनिक लेसर उपचार पद्धती, रेटीना सर्जरी तसेच तोंडाच्या कॅन्सर संबंधी सल्ला व उपचार, मार लागलेल्या जबड्याचे व चेहेऱ्याचे व्यावस्थापन, रुतलेला दात सर्जरीद्वारे काढणे जबडा व चेहेरा यांच्या आजारांचे उपचार तसेच डेंटल इम्प्लांट आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत अशी माहिती डॉ. सुचित व सौ. नेहा तांबोळी यांनी दिली.



टिळक रोड येथील मतिमंद मुलाच्या शाळेचा ४७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

# मतिमंद मुलांच्या शाळेचा ४७ वा वर्धापन दिन साजरा

नगर – मतिमंद विकास शिक्षण मंडळ, टिळकरोड, अहिल्यानगर संचलित मतिमंद मुलांच्या शाळेचा, ४७ वा वर्धापन दिन उत्साहात झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालिंदर पालवे हे होते. संस्थेचे संस्थापक कै. अरविंद खंडागळे व कै. वासंती अरविंद खंडागळे यांच्या प्रतिमेचे अनावरण प्रमुख पाहुणे जालिंदर पालवे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलतांना पालवे म्हणाले की, अहिल्यानगर मध्य दिव्यांग मुलंसाठी करत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यानी शाळेचे कामकाज पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सदस्य अविनाश कुलकर्णी यांनी कै. अरविंद खंडागळे व कै. वासंती खंडागळे यांच्या आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमास संस्थेचे सदस्य निलेश वैकर, योगेश अनासपूरे, ऋषीकेश खंडागळे, श्रीमती पियंका खंडागळे, शाळेचे मुख्याध्यापक योगेश आल्हाट आदी उपस्थित होते. यावेळी शाळे–तील मुलांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना व्हीआरडीई कडून देण्यात येणारी आर्थिक मदत देण्यात आली.

प्रास्तविक भाऊसाहेब कदम यांनी केले. सुत्रसंचालन माधवी कुटे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ऋषीकेश खंडागळे यांनी केले. या कार्यक्रमास पालक विद्यार्थी उपस्थित होते.



सावेडी उपनगरातील विनायकराज प्रतिष्ठाणच्या दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन केंद्रीय सहकार व नागरी उड्डाण मंत्री खा. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया– विजय मते)

# नगरच्या विनायकराज प्रतिष्ठाणच्या कार्याची केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळांकडून प्रशंसा

नगर – सावेडी उपनगरात गेल्या अनेक वर्षांपासून विनायकराज प्रतिष्ठाणच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत समाजकार्याचा वारसा सुरू ठेवून दरवर्षी दिनदर्शिकेच्या माध्यमातून संग्रही माहिती देत असल्याने यावर्षी दिनदर्शिका २०२५ मध्ये नगर शहरासाठी प्रेरणादायी सुविचार, विविध निसर्ग चित्रे यांचा समावेश केल्याने ही दिनदर्शिका संग्रही ठेवण्यासारखी आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरी उड्डाणमंत्री खा. मुरलीधर मोहोळ यांनी केले.

विनायकराज प्रतिष्ठाणने यंदाही दिनदर्शिका २०२५ प्रकाशित केली, त्याचे प्रकाशन मंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विपुल कल्याण वाखुरे, उपाध्यक्ष विनय कल्याण वाखरे, माजी नगरसेवक प्रदीप परदेशी, उद्योजक पवन पारिक, अनिल लगड व सदस्य उपस्थित होते. विपुल व विनय यांनी मंत्री मोहोळ यांना प्रतिष्ठाण च्या माध्यमातून केलेल्या कामाचा आढावा दिला. सामाजिक कार्याची माहिती दिली. श्री.मोहोळ यांनी त्यांच्या या कार्याबद्दल प्रतिष्ठाणसह त्यांचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळास प्रारंभ

नगर – अयोध्या येथील श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा वर्षपुर्ती दिनानिमीत्त आज पहिल्या दिवशी श्रीराम जय राम जय जय राम जपाने नवीपेठ येथील श्रीराम मंदिर परिसर दुमदुम तोय. या जपात भक्तीभावाने भाविक भक्त तल्लीन होत आहेत. श्रीराम जय राम जय जय राम हा जप अखंड २४ तास करण्यात येणार आहे. श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा व्दादशी सोहळा निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने मंदिरास फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. त्यामुळे मंदिरपरिसरात भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. सर्वत्र एक मंत्र ऐकू येत आहे. श्रीराम जय राम जय जय राम.... सकाळ पासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. ट्रस्टच्या सर्व पदाधिकऱ्यांनी भगवी टोपी आणि कुर्ता परिधान केल्यामुळे एक वेगळीच रोनक दिसून येत होती. येणाऱ्या सर्व भाविकांना प्रसाद वाटप होत आहे.



श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळानिमित्ताने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन आज मंदिरास फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. श्रीराम जय राम जय जय राम अखंड जपात भविक तल्लीन झाले. श्रीराम जय राम जय जय राम अखंड जप २४ तास करण्यात येणार आहे. भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

## श्रीराम जय राम जय जय राम जपाने श्रीराम मंदिर परिसर दुमदुमतोय

अयोध्या येथील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला एक वर्ष पुर्ण झाले आहे. त्यानिमित्त श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्यावतीने हा सोहळा साजरा करण्यात येत आहे. यामध्ये सकाळी अखंड २४ तास ।। श्रीराम जय राम जय जय राम ।। या तारक मंत्राचे नामस्मरणरुपी संगीत अनुष्ठान होत आहे. ८ जानेवारी रोजी रात्री ८ वा. भक्तीरंग प्रस्तुत रामायणाचार्य गोरक्षनाथ दुतारे महाराज (मुंबई दुरदर्शन कलाकार) यांची श्रीराम भजन सेवा (भजन संध्या) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद, ९ जानेवारी रोजी रात्री ८ वा. स्वामी श्री गोविंददेव गुरुजी महाराज यांचे कृपापात्र शिष्य पं. गिरीराज व्यास (पुणे निवासी) यांचे सुमधुर वाणीत श्री संगीतमय सुंदरकांड (भक्तीमय संगीत कार्यक्रम) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद, १० जा–नेवारी रोजी रात्री ८ वा. पं. राजेंद्र शर्मा (रामवाला) – गायक सी.ए. सागर शर्मा (नागपुर निवासी) प्रस्तुत ।। एक शाम प्रभु श्रीराम के नाम ।। (भजन संध्या) व कार्यक्रमा उपरांत महाप्रसाद, ११ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळ्यानिमीत्त सामुहिक महा हनुमान चालिसा पठण व महाआरती दरम्यान सामुहिक शंखनाद व घंटानाद, सायं. ७ वा. ढोलपथकाचे स्थीर वादन असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

शहरवासियांनी सहकुटूंब उपस्थीत राहुन प्रभु श्रीरामांच्या कृपाशिर्वादाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.



# मिक्स भाजीने करा रुचीपालट

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, त्याच त्या चवीच्या भाज्या खावून कंटाळा आला आहे का? तुम्ही मस्तपैकी मिक्स रस्सा करू शकता. आवडीचे मसाले घालून, वेगवेगळे फंडे लढवून तुमच्यातलं शेफचं कौशल्य पणाला लावा.

**साहित्य:** फ्लॉवरचे तुरे, एक कांदा, गाजर, थोडी फरसबी, मटार, टोमॅटो, दोन चमचे तेल, मोहरी, तिखट, हळद,गरम मसाला, मीठ आणि चिरलेली कोथिंबिर

**कृती:** सर्व भाज्या चिरून घ्या. कढई गॅसवर ठेऊन त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. त्यानंतर कांदा घालून छान परतून घ्या. त्यात हळद आणि तिखट घालून दोन मिनिटं परता. आता फ्लॉवर, गाजर, फरसबी, मटार घालून शिजू द्या. भाज्या शिजल्यावर बारीक चिरलेला टोमॅटो आणि गरम मसाला घाला. तो शिजल्यावर मीठ घाला. हलवून घ्या. सुकी भाजी नको असेल तर शेवटी थोडं पाणी घालून रस्सा करा.कोथिंबिरीने सजवा. ही भाजी तुम्ही पोळी किंवा पावासोबत खाऊ शकता.




## फंडू एसएमएस

जिंदगी के मजे
लेना सिखो
वक्त तो तुम्हारे
मजे
लेता ही रहेगा।

अपने तो अलग
असूल है। यार
के खातिर,
कांटे भी कबुल
है।

जिंदगी के सारे गम बांट
लेते है दोस्त,
क्यों जिंदगी में साथ देते है दोस्त,
रिश्ता तो सिर्फ उनसे दिल
का होता है, फिर भी हमें क्यों
अपना मान लेते हैं दोस्त।

**बंगळूरुची गणना देशातल्या सुंदर शहरांमध्ये होते. इथलं वातावरणही आल्हाददायक असतं. बंगळूरु हे बागांचं, तलावांचं शहर. मात्र इथे प्रदूषणही प्रचंड आहे. वायू प्रदूषणच नाही तर जल प्रदूषणाची समस्याही बंगळूरुला भेडसावते आहे. कचरा, सांडपाणी, कारखान्यातून बाहेर पडणारं रासायनिक पाणी यामुळे तलाव प्रदूषित झाले आहेत. यामुळे व्यथित झालेला ए. पवन रेड्डी या समस्येवर उपाय शोधण्याच्या प्रयत्नात आहे.**

# जलप्रदूषणावरील नामी उपाय

**अचिव्हर**

एअरोनॉटिकल इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलेला ए.पवन रेड्डी स्वत:पुरता विचार करून थांबला नाही. त्याला बंगळूरुतल्या प्रदूषित तलावांची खूप काळजी वाटते. तलावांचं शहर अशी ओळख असणाऱ्या बंगळूरुवर प्रदूषणाची काळी छाया आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इथल्या तलावांमध्ये कचरा टाकला जात आहे. इतकंच नाही तर कारखान्यांमधलं रासायनिक पाणी बेकायदेशीर पद्धतीने त्यात सोडलं जात आहे. इथला 'बेलांदूर' तलाव सर्वाधिक प्रदूषित झाला आहे. या तलावात सगळीकडे फक्त पांढरा फेस दिसतो. सतत टाकला जाणारा कचरा आणि सांडपाण्यामुळे अत्यंत विषारी असा हा फेस तयार झाला. याबाबत वृत्तपत्रांमध्येही बातम्याही छापून आल्या.

अनेकांप्रमाणे पवनलाही तलावाची अशी अवस्था बघवत नाही. 'बेलांदूर' तलावाची बिघडत जाणारी अवस्था बघतच तो मोठा झाला. वर्तमानपत्रांमध्ये याबाबत बातम्या यायच्या, काळजी व्यक्त केली जायची. पण प्रत्यक्षात काय करता येईल याबद्दल काहीच सांगितलं जात नव्हतं. यासाठी आपणच काहीतरी करायला हवं असं पवनच्या मनात आलं. त्याने प्रयत्न सुरू केले. या समस्येवरचा उपाय त्याला सापडला.फळांच्या सालांचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करता येईल, असा विचार त्याच्या मनात आला.



अशी परिस्थिती हाताळण्यासाठी इतर देश करत असलेल्या उपाययोजनांचा धांडोळा त्याने घेतला. यातून फारसं काही हाती लागलं नाही. परदेशात वापरलं जाणारं प्रगत तंत्र इथे वापरता येणार नव्हतं. मात्र त्याने हार मानली नाही. पवनचं संशोधन सुरूच होतं. याच दरम्यान त्याला फळांच्या सालांच्या शुद्धिकरण क्षमतेची माहिती मिळाली. कलिंगड, अननस, पपई, लिंबू, केळं अशा फळांच्या सालांमध्ये हे गुणधर्म असतात. ठोस काहीतरी मिळेपर्यंत त्याने एकही पाउल मागे घेतलं नाही. सुरूवातीला त्याने ताज्या फळांची सालं घेतली. सालांमधल्या पाण्याच्या प्रमाणामुळे पहिला प्रयोग फसला. मग त्याने उन्हात वाळवलेल्या सालांवर प्रयोग केला. वाळलेल्या सालींची पूड करून घेतली. 'फिल्टरेशन मेंब्रेन' तयार केला. त्यात 'हायड्रोक्लोरिक ॲसिड' घातलं. मग तलावातलं पाणी आणून फिल्टरमध्ये ओतलं. त्यात वाळलेल्या सालांची पूड घातली. १०० मिलिलीटर पाण्यात एक ग्रॅम पूड घातली. यानंतर पाणी ९० ते ९२ टक्क्यांपर्यंत शुद्ध झालेलं होतं. हे शुद्ध पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरता येईल, असं पवन सांगतो. आपलं हे संशोधन त्याने प्रदूषण नियंत्रण मंडळालाही दाखवलं. इथेही त्याची चाचणी यशस्वी ठरली. यानंतर त्याने या शोधाचा आवाका वाढवायचं ठरवलं आहे. 'बेलांदूर' तलाव स्वच्छ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असं तंत्रज्ञान त्याला वापरायचं आहे. पाण्याचे स्रोत प्रदूषित होत असताना पवनचं संशोधन भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल.



# वजन कमी करताय?

**फिटनेस फंडा**

वजन कमी करणं सोपं नसतं. जिभेवर नियंत्रण ठेवण्यासोबत व्यायामही करावा लागतो. अर्थात व्यायाम केला आणि वजन कमी झालं असं होत नाही. व्यायामही योग्य पद्धतीने करावा लागतो. चुकीचा तसंच चुकीच्या पद्धतीने केलेला व्यायाम घातक ठरू शकतो. वजन कमी करताना नेमकं काय करावं आणि करू नये याविषयी...

* सुरूवातीपासूनच तीव्र स्वरुपाचा व्यायाम करू नका. सोप्या पण प्रभावी व्यायामाने वजन कमी करण्याच्या प्रवासाला सुरूवात करा. सुरूवातीलाच तीव्र व्यायाम केल्यास तुम्ही लवकर दमाल. शिवाय स्नायू दुखवण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे दमाने घ्या.

* प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारचा व्यायाम आवडतो. कोणाला धावायला आवडतं तर कोणाला जॉगिंग बरं वाटतं. तुम्हीही ओढूनताणून व्यायाम करू नका. आवडत्या व्यायाम प्रकारांना प्राधान्य द्या.

* एकीकडे व्यायाम करायचा आणि दुसरीकडे जंक फूड खायचं याला काहीच अर्थ नाही. व्यायामासोबतच हेल्दी फूडही खायला हवं. तेलकट, गोड, मैद्याचे पदार्थ टाळा.

* खूप दिवसांनी व्यायाम सुरू केल्यानंतर अंगदुखी, स्नायूदुखीसारखे त्रास संभवतात. त्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती द्या. उगाचच धावपळ करू नका. विश्रांतीमुळे शरीर पुन्हा ताजंतवानं होईल आणि तुम्हाला बरं वाटेल.

## स्मार्ट टिप्स

### हे सर्च करू नका...




गूगल सर्चवर काहीही सर्च करता येतं. कोणतीही माहिती हवी असल्यास आपणही पटकन गूगल सर्चवर जातो. गूगलवर सगळं उपलब्ध असलं तरी त्यावर सगळ्या गोष्टी शोधू नयेत. आजारी पडल्यावर गूगलवर औषधाचा शोध घेऊ नका. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधं घ्या. ऑनलाईन शॉपिंगसाठी डिसकाउंट कूपन्सचा शोध घेत असाल तर सावध व्हा. अशा कूपन्सच्या माध्यमातून तुमचा डाटा चोरीला जाऊ शकतो. गूगलवर कस्टमर केअर नंबरही सर्च करू नका.

## बी अलर्ट


### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोन चोरीला गेलाय?

मोबाईल फोन चोरीला गेल्यानंतर चांगलीच पंचाईत होते.



फोनमधला महत्त्वाचा डाटा, फोटो, व्हिडिओ लीक होण्याची भीती वाटत राहते. मात्र तुम्ही हा डाटा घरबसल्या डिलिट करू शकता. यासाठी माय डिव्हायसेस गूगल डॉट कॉमवर जा. स्मार्टफोनमध्ये सेव्ह केलेला जी मेल आयडी ओपन करा. इथे प्ले साउंड, सिक्योर डिव्हाइस आणि इरेझ डिव्हाईस असे पर्याय दिसतील. यापैकी इरेझ डिव्हाइसची निवड करा. यानंतर जीमेल आयडी आणि पासवर्डची नोंद करून पुढे जा. आता तुमच्या जुन्या फोनमधला डाटा डिलिट झाला असेल. अर्थात यासाठी जुन्या फोनचं इंटरनेट कनेक्शन ऑन असायला हवं.

## ॲप वर्ल्ड


### संकटकाळाचा साथी

आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. अँड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.

# नातं टिकेल का?

**मॅच मेकिंग**

मी २९ वर्षांची तरुणी असून गेल्या दोन वर्षांपासून वयाने दोन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मुलाच्या प्रेमात आहे. भूतकाळात घडलेल्या काही अप्रिय घटनांमुळे त्याचा खऱ्या प्रेमावरचा विश्वासच उडून गेला आहे. आमचं नातं खूप घट्ट असलं तरी मी त्याला फक्त आवडते. त्याचं माझ्यावर प्रेम नाही. आयुष्यात स्थिरस्थावर व्हायचं की नाही याबाबत त्याच्या मनात बराच गोंधळ आहे. त्याला यावर काही बोलायचंही नाही. माझं त्याच्यावर खूप प्रेम असलं तरी आमच्या भविष्याबद्दल मला खूप काळजी वाटते. मी काय करू?



**उत्तर:** एखाद्याचा भूतकाळ त्याच्या वर्तमानावर प्रभाव टाकू शकतो. या परिस्थितीतून त्याचं त्यालाच बाहेर यावं लागेल. दुर्दैवाने तू त्याची फारशी मदत करू शकणार नाहीस. तू या नात्याबाबत साशंक असलीस तरी त्याने त्याचं मत तुला सांगितलं आहे. आपण कोणाच्याही भावना किंवा विचार बदलायला भाग पाडू शकत नाही. हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय असतो. काळानुरुप त्यात बदल होत असला तरी त्याची काहीच शाश्वती देता येत नाही. त्यामुळे तू तुझ्या आयुष्याचे प्राधान्यक्रम ठरव. या नात्याच्या चांगल्या आणि वाईट परिणामांची यादी कर. पूर्ण विचारांती पुढचा निर्णय घे.

# फ्लोरल्सचा ट्रेंड

**फॅशन पॅशन**

फ्लोरल म्हणजे फुलाफुलांच्या डिझाईनचे किंवा प्रिंटचे शर्ट आता मुलांच्या वॉर्डरोबचा भाग होऊ लागले आहेत. उन्हाळ्यात फ्लोरल प्रिंटचे हे शर्ट ताजेपणाची अनुभूती देतात. फ्लोरल्स खूप छान दिसतात. मात्र ते योग्य पद्धतीने कॅरी करणं आवश्यक आहे. आयुष्यात थोडे रंग भरण्यासाठी फ्लोरल शर्ट तुमच्या फॅशनचा भाग व्हायला हवेत. फ्लोरल्समुळे तुमचं व्यक्तिमत्त्व खुलू शकतं. ट्रेंडी फ्लोरल्स कशा पद्धतीने कॅरी करता येतील याविषयी...

* प्लेन, चेक्स किंवा स्ट्राईप्सवाले शर्ट घालण्याची सवय असणाऱ्या मुलांना फ्लोरल किंवा प्रिंटेड शर्टशी पटकन जुळवून घेता येत नाही. अशा वेळी न्यूट्रल रंगांची निवड करून सेफ गेम खेळता येईल. फ्लोरल प्रिंटवाला बेज रंगाचा कॉटन शर्ट आणि खाकी पँट असं कॉम्बिनेशन करा. यासोबत ड्रेस शूज कॅरी करा. ऑफिसमध्ये कॅज्युअल वेअर म्हणून असा पेहराव करता येईल.

* फ्लोरल शर्टवर डेनिम जॅकेट घालता येईल. यामुळे तुमचा लूक फार बटबटीत वाटणार नाही. तसंच तुम्ही ट्रेंडीही दिसाल. फ्लोरल शर्ट, डेनिम जॅकेट, ब्लू डेनिम जीन्स आणि स्नीकर्स घालून तुम्ही चित्रपट बघायला जाऊ शकता.



* मोठ्या प्रिंटवाला किंवा गडद रंगाचा फ्लोरल शर्ट आणि फिकट रंगाची पँट हे कॉम्बिनेशन शोभून दिसेल. अशा शर्टसोबत लिननची ऑफ व्हाईट पँट घाला. ग्रीन कॅनव्हास स्नीकर्सनी तुमचा लूक खुलवा. मित्रमंडळींसोबत भटकंती करायला जायचं असेल तर हा पेहराव बेस्ट ठरेल.

* जास्त स्टायलिश दिसायचं असेल तर काळ्या टी शर्टवर फ्लोरल प्रिंटचा शर्ट जॅकेटसारखा कॅरी करा. यावेळी ब्राउन ट्राउझर घाला. कॉफी डेटसाठी हा पेहराव अगदी उत्तम आहे.

* मोनोक्रोमॅटिक फॅशनही करता येईल. काळ्या फ्लोरल शर्टवर काळी पँट घाला. स्नीकर्सऐवजी काळ्या स्लीप ऑन्सही निवड करा. कॅफे किंवा रेस्टॉरंटमध्ये जाताना हा लूक कॅरी करा.

* खास प्रसंगासाठी तयार होतानाही फ्लोरल्स कॅरी करता येतील. फ्लोरल शर्टवर ऑफ व्हाईट ब्लेझर घाला. सोबत ज्यूट कॉटन ट्राउझर असेल तर उत्तमच! फ्लोरल कफलिंक्स, पॉकेट स्क्वेअरने तुमचा लूक खुलवा.

# तारेल वाचनाची आवड

**वेगळ्या वाटा**

वाचाल तर वाचाल असं म्हटलं जातं. पुस्तकांचं वाचन हा ज्ञान मिळवण्याचा उत्तम मार्ग आहे. वाचनाचा हा छंद विविध प्रकारच्या करिअरमध्ये यश मिळवून देऊ शकतो. वाचनामुळे आपण प्रगल्भ होतो. भाषा समृद्ध होत जाते. मेंदूला तरतरी येते. वाचन करणारे युवक–युवती करीअरचे कोणते मार्ग अवलंबू शकतात याविषयी...



* 'मार्केट रिसर्च ॲनालिस्ट' स्पर्धक कंपन्या, बाजारपेठेतली स्थिती आणि ग्राहकांच्या व्यवहाराचा अभ्यास करून संबंधित कंपनीची उत्पादनं तसंच सेवा उपलब्ध करून देतात. यात बरंच वाचन करावं लागतं. 'मार्केटिंग' आणि 'मार्केट रिसर्च'सह 'इंन्फॉर्मेशन सायन्स'चे अभ्यासक्रम या क्षेत्रात उपयोगी पडतील.

* 'कंटेंट रायटर' म्हणून काम करता येईल. वेबसाईट्ससाठी लिखाण करता येईल. 'ब्लॉगर' म्हणून सुरूवात केल्यानंतर पुढे मार्ग मिळत जातील.

* वाचनाच्या आवडीसह कल्पकता असेल तर 'स्लोगन रायटिंग' आणि आकर्षक हेडिंग्ज तयार करून 'कॉपी रायटिंग'च्या क्षेत्रात हात आजमावता येईल.

* प्रकाशनाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत.

* पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करून वृत्तपत्रात नोकरी करता येईल. या कामाला सध्या बरंच वलय आहे.

* वकिलांनाही भरपूर वाचन करावं लागतं. सतत कायदे अभ्यासाचे लागतात.सर्वोच्च तसंच उच्च न्यायालयाचे निकाल वाचावे लागतात. त्यामुळे वाचनाची आवड इथे तारून नेऊ शकते.

# नितांत सुंदर कोला बीच

**भटकंती**

गोवा हे प्रसिद्ध टूरिस्ट टेस्टिनेशन. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत भटकंती करता येते. समुद्रात मनसोक्त डुंबता येतं. 'फुल टू धम्माल' करण्यासाठी गोव्यासारखं उत्तम ठिकाण नाही. गोव्यात सगळं काही आहे. इथल्या नागमोडी रस्त्यांवरून बाईक चालवण्याचा आनंद वेगळाच. गोव्यातले शांत आणि रम्य समुद्रकिनारे मन मोहवून टाकतात. इथे काही काळ घालवल्यानंतर मन कसं प्रसन्न होऊन जातं. आपण नव्या उत्साहाने कामाला लागतो. गोव्यातले अनेक समुद्रकिनारे प्रसिद्ध आहे. विविध बीचवर पर्यटकांचा गजबजाट पहायला मिळतो. मात्र याच गोव्याच्या कुशीत दडलेली काही रत्न या गजबजाटापासून, कोलाहलापाहून दूर आहे. असंच एक रत्न म्हणजे कोला बीच. कोलाची गणना गोव्यातला सुंदर आणि आकर्षक बीचमध्ये होते. विशेष म्हणजे इथे शांतता असते.

तुम्हालाही गजबजाटापासून काही काळ लांब रहायचं असेल तर गोव्याला या आणि कोला बीचला भेट द्या. या बीचलगत महागडी रिसॉर्टस किंवा हॉटेल्स नाहीत मात्र तुमच्यासाठी तंबूची सोय होऊ शकते. साधं पण चविष्ट जेवण मिळू शकतं. कोला हा स्वच्छ आणि सुंदर बीच आहे. इथल्या निळ्याशार समुद्रात पोहण्याची हौस भागवता येईल. या बीचवर कयाकिंगची सुविधा आहे. कयाकिंगची गणना धाडसी खेळांमध्ये केली जाते. वेगळा अनुभव म्हणून कयाकिंग करता येईल. या बीचवर सूर्यास्ताचं मनोहारी दर्शन घडतं.

कोला हा गोव्यातला सर्वोत्तम बीच असल्याचं म्हटलं जातं. या समुद्रकिनारा छोटेखानी टेकड्यांनी वेढलेला आहे. भरपूर झाडी असणाऱ्या या टेकड्यांमुळे समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्याला चार चांद लागले आहेत.गोव्यातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांवरून सूर्यास्ताचं दर्शन घडत असलं तरी कोलाचा सूर्यास्त वेगळाची आहे. निसर्गरम्य वातावरणामुळे इथला सूर्यास्त खास ठरतो. या बीचवरची सोनेरी वाळू आपल्याला आकर्षित करते. या वाळूवर नुसतं बसून राहिलं तरी खूप छान वाटतं. पणजीहून कोला बीचला जायला दोन तास लागतात. या प्रवासादरम्यान वेगळाच निसर्ग तुम्हाला खुणावत असतो.



# भारतीय मजदूर संघ संघटीत असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करणार

## जिल्हा अधिवेशनामध्ये घोषणा



जिल्हा अधिवेशनप्रसंगी भारतीय मजदूर महासंघाचे पदाधिकारी.

नगर – संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या न्याय हक्कांच्या मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघाच्या झेंड्याखाली एकत्रित येवुन संघर्ष करा असे आवाहन अखिल भारतीय मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी अहिल्यानगर जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशन आयुर्वेदिक व्यासपीठ सावेडी, अहमदनगर या ठिकाणी झाले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे दक्षिण जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी यावेळी मजदूर संघाबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी पुणे विभाग संघटनमंत्री अर्जुन चव्हाण उपस्थित होते.

कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षक, कामगारांना रोजगारात सुरक्षा, सन्मानजनक वेतन, सामाजिक सुरक्षा या बाबतीत भारतीय मजदूर संघ अहिल्यानगर जिल्हा मध्ये तालुका पातळीवर प्रवास, संपर्क करणार असून यावेळी कामगारांनी एकजुटीने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा सेक्रेटरी कृष्णा साठे यांनी केले आहे. स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उपस्थितांना समोर मांडला. या कार्यक्रमासाठी अहील्यानगर जिल्ह्यातून भारतीय मजदुर संघाशी सलग्न असलेल्या राज्य शासकीय कर्मचारी संघ, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, वीज कंत्राटी कामगार संघ, महाराष्ट्र बँक, सुरक्षा रक्षक महासंघ, अंगणवाडी कर्मचारी, एलआयसी, पोस्ट, रेल्वे, पुरातत्व विभाग, बांधकाम कामगार, औद्योगिक कामगार (MIDC), आरोग्य विभाग, व्ही. आर.डी, संरक्षण विभाग, रेल्वे, एस.टी. महामंडळ, नगरपरिषद, नगरपालिका या विभागातील सर्व सभासद उपस्थित होते.

यावेळी पुढील तीन वर्षासाठी नूतन कार्यकारणी विभाग प्रमुख अर्जुन चव्हाण यांनी घोषित केली. अध्यक्ष सुजित उदरभरे, कार्याध्यक्ष संजय दुधाने, सेक्रेटरी कृष्णा साठे यांची निवड करण्यात आली. यावेळी राधेश्याम कुलकर्णी, अशोकराव भोंग, सुनील मुंगसे, अशोकराव मुळे, सर्वोत्तम क्षीरसागर, प्रदीप भाटे, सुभाष जगदाळे, प्रकाश नहार हे सल्लागार व विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संपूर्ण जिल्हाभरातून कार्यकर्ते हजर होते. या वेळी कार्यालय नूतनीकरण करताना सहयोग देणाऱ्या सभासदांचा सत्कार करण्यात आला. नवीन कार्यकारणीमध्ये उपाध्यक्ष दिनेश पुसदकर, उपाध्यक्ष सौ. माधुरी देवढे, उपाध्यक्ष सुनिल तरटे, संघटन मंत्री संतोष सुरवसे, खजिनदार माणिकराव सोनटक्के, प्रसिद्धी प्रमुख म्हणून अविनाश सिरसूल यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतिश डहाणे, संदीप हापसे, सचिन पाटील, फारूक शेख, अविनाश ओतारी यांनी परिश्रम घेतले.


अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देताना स्पर्धेचे संयोजन व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप. समवेत केंद्रीय राज्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. मुरलीधर मोहोळ आदी. (छाया – लहू दळवी)

# नगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र केसरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण

नगर – अहिल्यानगर शहरात महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाच्या वतीने होणाऱ्या वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व 'महाराष्ट्र केसरी' किताब लढत २०२४–२५ ही स्पर्धा २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीमध्ये वाडीया पार्क मैदानावर होणार आहेत. या स्पर्धेतील महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीतील विजेत्या कुस्तीगीरास मानाची गदा प्रदान करण्यासाठीचे निमंत्रण व विनंती पत्र स्पर्धेचे संयोजन व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत सोमवारी भेट घेऊन दिले.

यावेळी केंद्रीय राज्य मंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप भोंडवे, सरचिटणीस हिंद केसरी पै. योगेश दोडके व राज्य कुस्तिगीर संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी स्पर्धाचे यजमानपद अहिल्यानगर शहराला मिळाले असून आयोजनाची जबाबदारी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघास मिळालेली आहे. अंतिम लढतीस राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहून कुस्तीगीरांना प्रोत्साहन द्यावे अशी इच्छा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची, जिल्हा कुस्तीगीर संघाची व राज्यातील तमाम कुस्तीप्रेमींची असल्याचे आ.जगताप यांनी यावेळी सांगितले.

# वि. ल. कुलकर्णी शाळेत वीर बाल दिवस साजरा

नगर – वीर बाल दिवस निमित्त राष्ट्रहित संवर्धक मंडळ, अहिल्यानगर यांच्यावतीने कै.विश्वास लक्ष्मण कुलकर्णी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना ४ जानेवारी रोजी गुरु गोविंदसिंह यांचे पुत्र वीर बालक 'गुरुपत्र फतेहसिंह, जोरावर सिंह' या पुस्तकाचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रहित संवर्धक मंडळाचे महेंद्रभाई चंदे यांनी गुरुपुत्र फतेहसिंह व जोरावर सिंह यांनी लहान वयातच धर्माच्या रक्षणासाठी आपले बलिदान दिले. त्यांचे हौतात्म्य देशाच्या एकजुटीसाठी कसे महत्वपुर्ण ठरले हे आपल्या मनोगतातून विशद केले. या दोन छोट्या वीर बालकांच्या साहस आणि बलदिनाचे प्रतिक म्हणुन २६ डिसेंबर हा दिवस बाल दिवस म्हणून साजरा होतो. या वीर बालकांकडून विद्यार्थ्यांनी साहस, धाडस, शौर्य यांची प्रेरणा घ्यावी असे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी राष्ट्रहित संवर्धक मंडळाचे संजय वाळुंज, सुमेध गंधे, लगड तसेच दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रेखे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सचिव किरण वैकर, खजिनदार उमेश नगरकर, मुख्याध्यापिका सौ.विद्या खडके, प्राचार्य सुनिल पंडित, बालवाडी विभागप्रमुख सौ.अनुराधा जोशी, शाळेचे सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.


रेव्हेन्यू सोसायटी २०२५च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – बबलू शेख)

# रेव्हेन्यू सोसायटी २०२५ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

नगर – महसूल व नोंदणी खात्यातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थेच्यावतीने काढण्यात आलेल्या सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, सामान्य प्रशासन तहसीलदार शरद घोरपडे, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक सुरेश आघाव, संस्थेचे चेअरमन संतोष मांडगे, माजी चेअरमन संदीप तरटे, संचालक सुरेश राऊत, प्रवीण बोरुडे, प्रदीप अवचर, सनी जाधव, संचालिका सुनंदा मरकड, राज्य ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे पदाधिकारी गणेश जाधव, सुरेश जेठे, सभासद राजेंद्र लाड, पंकज जगदाळे, रामदास गवळी व संस्थेचे जनरल सेक्रेटरी बाबासाहेब पालवे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी सालीमठ यांनी संस्थेविषयी चर्चा केली. संस्थेचे चढता आलेख व आदर्श कार्यपद्धतीचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

संतोष मांडगे यांनी सोसायटीच्या कामाची व योजनांची सविस्तर माहिती दिली. सर्व संचालकांना बरोबर घेऊन अधिकाधिक चांगल्या पद्धतीने कामकाज करून सभासदाभिमुख निर्णय घेतले जात असल्याचे सांगितले.

# वि.ल.कुलकर्णी शाळेत 'बालिका दिन' साजरा

नगर – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त कै.विश्वास लक्ष्मण कुलकर्णी प्राथ. शाळेत ३ जानेवारी रोजी 'बालिका दिन' साजरा करण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. सावित्री बाईंच्या कार्याविषयी श्रीमती वैराळ यांनी प्रास्ताविकातून माहिती सांगितली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रेखे यांनी आजची स्त्री कशी सक्षम आहे आणि तिने सर्वच क्षेत्रे पादांक्रांत करत उज्वल भविष्याकडे वाटचाल सुरु केली आहे याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले.

सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा जो पाया घातला, ज्यामुळे आजची स्त्री स्वत:च्या पायावर उभी राहू शकली त्यासाठी आपण सावित्रीबाईंचे ऋणाईत रहावयास हवे अशी अपेक्षा व्यक्त करत संस्थेचे सचिव किरण वैकर यांनी बालिका दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याविषयी भाषणे केली. शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत महायुतीचे उमेदवार निवडून द्या, साकळाईची जबाबदारी माझी : ना. राधाकृष्ण विखे


नगर तालुक्यातील देऊळगाव सिद्धी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील समवेत आ. शिवाजी कर्डिले, आ.विक्रम पाचपुते आदी.

नगर – नगर दक्षिणेतील दुष्काळी भाग पाणीदार करण्याच स्व. बाळासाहेब विखेंचे स्वप्न आम्हीच पुर्ण करणार आहोत . साकळाई योजनेसाठी सुजय विखे यांनी मोठे काम केले. मात्र या योजनेबाबत लोकांचा बुद्धीभेद करून लोकसभेला निवडून आलेल्या खासदाराला साकळाई योजनेसाठी काय करायच हे माहित आहे का? विधानसभेला स्वतःच्या तालुक्यातील लोकांनी नाकारले ते साकळाई योजना करणार काय? आगामी जिल्हा परिषद निवडणूकीत महायुतीचे उमेदवार निवडून द्या, साकळाई योजनेची जबाबदारी माझी असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

नगर तालुक्यातील देऊळगाव सिद्धी येथे बाजार समितीचे संचालक संजय गिरवले यांनी सुरू केलेल्या पेट्रोल पंप उद्घाटन प्रसंगी ना. विखे पाटील बोलत होते. यावेळी आ. शिवाजीराव कर्डिले, आ. विक्रम पाचपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, संजय गिरवले, शुभम गिरवले, दिपक दाते, सचिन कोतकर, उपसभापती रभाजी सुळ, संतोष म्हस्के, संदेश कार्ले, अभिलाष घिगे आदींसह तालुक्यातील राजकीय नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना ना . विखे म्हणाले नगर–श्रीगोंदा तालुक्यातील १२ हजार हेक्टर क्षेत्र साकळाई योजनेमुळे ओलीताखाली येणार आहे. मात्र साकळाई योजनेला आडकाठी आणण्याचे काम पुणेकर मंडळी करायचे. माजी खा. सुजय विखेंनी साकळाई सर्व्हेक्षण पुर्ण केले. पाणी उपलब्ध असल्याचा दाखला मात्र पुणेकरांनी दिला नाही. राज्याचा जलसंपदा विभाग माझ्याकडे आल्याने आता पुणेकरांची दादागिरी मोडून काढणार असल्याचे ना. विखे यांनी सांगितले. लोकसभेला साकळाई बाबत लोकांचा बुद्धीभेद करून, खोटे आश्वासन देऊन खासदारकी मिळविली. विधानसभेला बारा झीरो करू म्हणाऱ्यांना स्वतःच्या तालुक्यानेच नाकारले.

नगर–श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याची साकळाई योजना मार्गी लावण्याच काम मी करणार आहे. मात्र आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत महायुतीचे उमेदवार निवडूण द्या, मग साकळाईची जबाबदारी माझी असल्याचा शब्द ना. राधाकृष्ण विखे यांनी दिला.

### मुख्यमंत्री अन् बारा झीरोचे स्वप्न, थोरात, खा. लंके यांना लगावला टोला

लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या यशामुळे काहींना मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पडले. तर खासदारकी मुळे हवेत गेलेल्यांना बारा झीरोचे स्वप्न पडले. मात्र विधानसभा निवडणूकीत जनतेनी दिवसा स्वप्न बघणाऱ्यांना स्वत:च्या मतदार संघातच चारीमुंड्यात चीत करून जमिनीवर आणल्याचा टोला थोरात व लंके यांचा नामोउल्लेख टाळत ना. विखे यांनी मारला.



## बालिकाश्रम रोडवर वाहतूक कोंडी

नगर मधील बालिकाश्रम रोडवर वाहतूक कोंडी सकाळ–संध्याकाळ नित्याचीच झाली आहे, ना याकडे प्रशासनाचे लक्ष आहे. त्यामुळे येथील रहिवाशांना व जाणाऱ्यांना रोजच वाहतूक कोंडीमुळे त्रास होत आहे

# राज्यात १ एप्रिल पासून टोलनाक्यांवर फास्ट–टॅगद्वारेच पथकर भरावा लागणार

मुंबई – राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट–टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सद्याच्या सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

फास्ट टॅग च्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सूसुत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट–टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट – टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट–टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.

राज्यात सद्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

# वारस हक्काने सफाई कामगारांना कायम नियुक्ती देऊन ८ दिवसात अहवाल द्यावा

### माजी नगरसेवक दीप चव्हाण यांच्या शिष्टमंडळाच्या निवेदनावरून राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सचिव ॲड. गोरक्ष लोखंडे यांचे महानगरपालिका आयुक्तांना निर्देश

नगर – राज्य शासनाच्या लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी वारस हक्क सफाई कामगारांना कायम नियुक्ती द्यावी आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे असे निर्देश महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य सचिव गोरक्ष लोखंडे यांनी दिले आहेत.

माजी नगरसेवक दीप चव्हाण यांच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनानंतर लोखंडे यांनी या प्रश्नांत जातीने लक्ष घातले. लोखंडे हे नगर दौऱ्यावर होते. शासकीय विश्राम गृह येथे त्यांनी वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरावार, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, मनपा आयुक्त यशवंत डांगे, सहायक आयुक्त आस्थापनाचे मेहेर लहारे, अतिरिक्त आयुक्त संभाजी अंभोरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे आणि कर्मचारी तसेच दीप चव्हाण, वाघेला, दलित नेते उत्तमराव गायकवाड, माजी नगरसेवक संजय घुले, सुरज गोहेर, यश चव्हाण, युवराज ढगे तसेच अनुसूचित जाती जमाती कामगारासाठी सतत लढणारे कामगार नेते उपस्थित होते.

या बैठकीत सफाई कामगाराच्या कायम नियुक्तीच्या प्रश्नावर लोखंडे यांनी अधिकाऱ्याशी चर्चा केली. मनपाकडे या कर्मचाऱ्यांना कायम करून घेण्यासाठी तिजोरीत पैसे नाहीत असे कारण दिले जाते. जे की अयोग्य आहे. अधिकाऱ्यांना स्वतःच्या खिशातील पैसे थोडीच द्यायचे आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा हा अवमान आहे. हे बिलकुल चालणार नाहीत. येत्या ८ दिवसात नगर मनपा, जिल्हापरिषद, नगरपालिका तसेच नगर पंचायती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थेत सर्वच वारसा हक्क सफाई कर्मचाऱ्यांना कायम करून घ्यावे आणि ८ दिवसात अहवाल आयोगाकडे पाठवावा असे त्यांनी निर्देशित केले.


राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सचिव ॲड. गोरक्ष लोखंडे यांना निवेदन देताना दीप चव्हाण व शिष्टमंडळ.

गेल्या १९७५ सालापासून आजतागायत तत्कालीन नगरपालिका आणि आताच्या महानगरपालिकेत कंत्राटी तसेच वारसाहक्काने कायम नोकरीची ३०५ आणि ५११ प्रकरणे प्रलंबित आहेत. याबाबत दीप चव्हाण यांनी सतत आवाज उठवला. प्रशासकीय आणि न्यायालयीन स्तरावर पाठपुरावा केला. मुंबई उच्च न्यायालयांच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे दरवाजे ठोठावले. आणि नियुक्ती आदेश आणला. तरीदेखील या आदेशाला मनपा आयुक्त डांगे यांनी या कामगारांना कायम करून घेण्यास सपशेल नकार दिला. ही बाब दीप चव्हाण यांनी लोखंडे यांच्या निदर्शनास आणून दिली त्यावर लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार तात्काळ कामगारांना कायम नियुक्त करून आयुक्तांनी अहवाल सादर करावा असे त्यांनी सांगितले आहे.

वारसा हक्क सफाई कामगारांना स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच मनपात कायम नियुक्ती देण्यात यावी असे आदेश राज्य शासनाने २४ फ ेब्रुवारी २०२३ रोजी दिलेले आहेत. त्यानंतर १८ ऑक्टोबर २०२३ रोजी पत्र पाठवून राज्याचे नगर परिषद प्रशासन संचालनलयाचे आयुक्त तथा संचालक मनोज रानडे यांनी राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत तसेच जिल्हापरिषद पंचायत समित्यांना या आदेशाची तात्काळ अंमलबजाणी करावी असे आदेशित केले होते. स्थानिक पालिका आणि राज्य शासन या आदेशाचे पालन करीत नाहीत. याबाबत उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात रिट पिटिशन दाखल करून चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २४ जून २०२४ रोजी तात्काळ नियुक्ती आदेश देखील आणला होता. मात्र यांची अंमलबजावणी होत नाही आणि अहिल्यानगर मनपातील ३०५ व ५११ वारस हक्क सफाई कामगारांना कायम केले जात नाही ही बाब चव्हाण यांनी या बैठकीत निदर्शनास आणून दिली आहे हे आदेश त्यांनी पारित केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

ब्रिटानिया कंपनीच्या उत्पादनासाठी
**त्वरित पाहिजेत**
* सेल्समन : जागा – २
* हेल्पर जागा –४ (इंग्रजी वाचता येणे आवश्यक)
(अर्जासह समक्ष भेटा)
**मनिष ट्रेडिंग कंपनी**
सातभाईगल्ली, एसबीआय बँकेजवळ,दिल्लीगेट,अ.नगर
9822054061

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
**त्वरित पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर कम कॅशिअर – ०१
टॅलीज्ञान आवश्यक (१ ते २ वर्षांचा अनुभव)
सेल्समन/सेल्सगर्ल – ०५ १ ते २ वर्षांचा अनुभव, पार्ट/फुल टाईम
हेल्पर – ०२
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES
One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address
Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar

क्लिनिकसाठी
**डॉक्टर पाहिजे**
(सर्व सुविधायुक्त सेटअप)
केडगाव येथे नेप्ती रोड
9763767767

रिटायर्ड पर्सन, गृहिणी, सेल्फ एम्प्लॉइड, बिझनेस मॅन साठी सुवर्णसंधी अहमदनगर मधील नामांकित मल्टिनॅशनल कंपनीमध्ये घरबसल्या काम करुन 50 हजार ते 1 लाख रुपये महिना कमावण्याची संधी.
**महादेव घोडे**
98 81 55 69 69

**त्वरित 1BHK फ्लॅट विकणे**
पाईपलाईन रोड टच, भिस्तबाग चौक, अ.नगर
9370721428

**टेम्पो रिक्षा विकणे आहे**
9527697870
8087022677

**भाड्याने देणे**
शिवनेरी चौक, स्टेशन रोड येथील
1 BHK
तळ मजल्यावरील घर काही अटी शर्तीवर त्वरित भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व !
9890697593

**भाड्याने देणे**
भुषणनगर, कांतीचौक विधाते गिरणी जवळ १०X१० चे दोन गाळे भाड्याने देणे आहे
(महिला उद्योजकांना प्राधान्य)
9823340767

**2BHK फ्लॅट/बंगला भाड्याने पाहिजे**
कलेक्टर ऑफिस, गुलमोहर रोड, टी.व्ही.सेंटर, तारकपुर
9822040626


**श्री.अशोक विश्वनाथ चोभे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) पक्षाच्या नगर तालुका प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी**
(अजित पवार गट) नगर तालुका


# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि.,

मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, अहमदनगर
ई-मेल : ahmednagar.dccbankgmail.com,
वेबसाईट : www.adccbanknagar.org

## बँकेच्या सरळसेवा नोकरभरती अंतर्गत ऑनलाईन परिक्षेबाबत जाहीर प्रकटन


दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर या बँकेच्या सरळसेवा नोकरभरती अंतर्गत मे. वर्कवेल इन्फोटेक प्रा. लि., पुणे या एजन्सीमार्फत पुणे येथील विविध परिक्षा केंद्रांवर उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहेत.

सदरहू ऑनलाईन परिक्षा दिनांक ९.१.२०२५, १०.१.२०२५, ११.१.२०२५, १२.१.२०२५, १३.१.२०२५ व १९.१.२०२५ रोजी घेण्यात येणार आहे. एजन्सीमार्फत उमेदवारांना त्यांचे परिक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) बँकेच्या www.adccbanknagar.in व www.adccbanknagar.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आले आहेत. उमेदवारांना सदरहू संकेतस्थळावर स्वतः चे युजर आयडी व पासवर्ड द्वारे लॉगईन करून सदरहू प्रवेश पत्र डाऊनलोड करून घेता येणार आहेत. उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर दोन तास आधी उपस्थित रहावयाचे आहे.

तसेच ज्या उमेदवारांना परिक्षा प्रवेशपत्रासंदर्भात कंपनीकडून एसएमएस / सुचना आलेल्या नाहीत, अशा सर्व उमेदवारांना या जाहीर प्रकटनाद्वारे सुचित करण्यात येते की, संबंधीत उमेदवारांनी आपले प्रवेशपत्र लॉगईनद्वारे डाऊनलोड करून घ्यावे. यामध्ये काही अडचण निर्माण झाल्यास, कंपनीच्या हेल्पलाईनशी त्वरीत संपर्क साधुन कार्यवाही करावी. याबाबत हे जाहीर प्रकटन प्रसिध्द केले आहे. याची सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : ६.१.२०२५

**जनरल मॅनेजर पर्सोनेल**


**घराची सुरक्षा**
३६५ दिवस ३६० डिग्रीमध्ये

ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622

राजा सारखे मन... मना सारखा राजा...
प्रेरणास्थान | खंबीर नेतृत्व
मा.आ. अरूण काका जगताप – विधान परिषद सदस्य
आ. संग्रामभैय्या जगताप – आमदार

लिंगायत गवळी समाज बांधवांचे आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व विकासासाठी सामाजिक कार्य करणारे नेतृत्व
**मा.श्री. प्रकाशजी भागानगरे**
आपणास वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
**मा.श्री. प्रकाशजी बाबुराव भागानगरे**
नगरसेवक – अ.नगर म.न.पा., स्थायी समिती सदस्य
अध्यक्ष – वीरशैव लिंगायत गवळी समाज ट्रस्ट
रजि. नं. : अे – ३४
**वीरशैव लिंगायत गवळी समाज ट्रस्ट, अहमदनगर**
विश्वस्त – हिरामन बेद्रे (सेक्रेटरी), संतोष गेनाप्पा (खजिनदार), रखमाजी निस्ताने, सतिश हरबा, सुभाष भागानगरे, भाऊसाहेब हुच्चे, गोविंद (दादा) मिसाळ, आप्पा बारसे, चंद्रकांत औशिकर, विष्णु कलागते, संतोष उन्हाळे
समस्त वीरशैव लिंगायत गवळी समाज बांधव

THE GREATEST EVER DISCOUNT OFFER
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
BIG DISCOUNT DAYS
9th to 18th Jan

Any Course Just in 1450/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST | 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP | ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++ | CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, A.agar – 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, A.nagar. – 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, A.nagar. – 7447761769


परिशिष्ट- १

## महाराष्ट्र शासन कृषि विभाग, उपविभागीय कृषि अधिकारी, संगमनेर

यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकिय भवन, २ रा मजला, नवीन नगर रोड, ता. संगमनेर जि. अहिल्यानागर. दुरध्वनी क्रमांक- (०२४२५-२२५४८७) E-mail ID- sdaosangamner@gmail.com

## ई- निविदा सूचना क्र. १४ सन २०२४ - २५

उपविभागीय कृषि अधिकारी, संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून सा.बां. विभाग/ जलसंपदा विभाग/ जलसंधारण महामंडळ/मृद व जलसंधारण (कृषि विभाग) विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (Online) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी तसेच कोणतीही अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, संगमनेर जिल्हा अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

**सर्वसाधारण जिल्हा वार्षीक योजना (उ्झाउ्ड), जलयुक्त शिवार २.० सन २०२३-२४ अंतर्गत**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | निविदा फी | निविदा बयाना रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सि.ना.बा. खोलीकरण मौजे निमोण गट क्र.१८,२३,२६ मौजे सोनेवाडी गट क्र. ३ ता. संगमनेर | २३,०७,८३७.०० | ५९०.०० | २३,१००.०० | ३० दिवस | नोंदणीकृत कंत्राटदार (ई निविदा-स्पर्धात्मक खुल्या) |
| २ | सि.ना. बा. खोलीकरण मौजे निमोण ता. संगमनेर गट क्र. २१.२२.११ | २४,२१,८७८.०० | ५९०.०० | २४,३००.०० | ३० दिवस | नोंदणीकृत कंत्राटदार (ई निविदा-स्पर्धात्मक खुल्या) |


ई- निविदा उपलब्द कालावधी :- दिनांक:-०७/०१/२०२५ ते २१/०१/२०२५
ई निविदा उघडने :- दिनांक :- २४/०१/२०२५ वेळ :- ११.३० वा सकाळी (शक्य असल्यास)
खालील संकेत स्थळावर ई-निविदेची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्येकाही बदल होत असल्यास वरील संकेत स्थळावर कळवण्यात येइल.)
सविस्तर अटी व शर्तीकरीता वरील संकेत स्थळावर / कार्यालयाच्या सूचना फलकावर पाहवयास मिळतील.
जाक्र/उविकृअ/निविदा क्र.१४ / २८/२०२५
कार्यालय : उपविभागीय कृषि अधिकारी, संगमनेर दिनांक : ०३/०१/२०२५

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
संगमनेर जि. अहिल्यानगर

जिमाका/नगर/ जाहि / १९३ / २०२४-२५


VAISHNAVI TILES & TRADING CO.
◆ सर्व प्रकारच्या टाइल्स ◆ ग्रॅनाइट ◆ सॅनिटरी वेअर ◆ पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग ◆ C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA innovating happiness TILES • BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | CARYSIL German Engineered | colortile | RAK | NIRALI BG | TIMEX | ICON




**डॉ.अद्वैत गिते**
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
**अक्षय (गिते) हॉस्पिटल**
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. ०७/०१/२०२५.**

### परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे कौडगांव येथील शेतजमिन** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे -

**गट नंबर ९१ चे क्षेत्र ६ हे. ५७ आर + पो.ख. ० हे. ७९ आर असे एकुण क्षेत्र ७ हे. ३६ आर याचा आकार ७ रु.०० पैसे यापैकी विद्यमान मालकाच्या मालकीचे पुर्व बाजुचे क्षेत्र ४हे. ३८आर + पो.ख. ० हे. ५३आर असे एकुण क्षेत्र ४हे. ९१ आर ही संपुर्ण शेतजमिन मिळकत.**


**यांसी चतु:सिमा :**

| | |
|---|---|
| पुर्वेस – पिंपळगांव घाट शिव रस्ता | दक्षिणेस – गट नं. ९२ |
| पश्चिमेस – गट नं. ९१ पैकी | उत्तरेस – गट नं. ७४, ७५, ७७ व ७८ |

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक -**
१. **ज्ञानेश्वर बाळासाहेब शिंदे,** रा. मु. पो. पारेवाडी, ता. जि. अहिल्यानगर.
२. **नितीन विठ्ठल लांडगे,** रा. मु. पो. पिंपळगांव लांडगा, ता. जि. अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफिस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९, ९८६०८०५५५९




**हिमालय, पारस, प्लास्टो व सिंटेक्स**
या कंपन्यांचे १०० लिटर ते ५००० लिटर पर्यंतच्या टाक्या १० वर्षे गॅरंटीसह उपलब्ध..
**मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर**
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011